



# साईभक्तीचे मर्म

- म. द. जोशी

(विश्वस्त श्री साईबाबा संस्थान)

*मुंबईमध्ये १९५४ साली पहिले अ.भा. साईभक्त संमेलन झाले त्यामध्ये तत्कालिन उपराष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या हस्ते प्रकाशित झालेल्या 'श्री साई भक्ति सुमनामृत' या श्री म. द. जोशी लिखित पुस्तिकेतील एक प्रकरण येथे देत आहोत. या पुस्तिकेस श्री साईबाबांच्या बाळाचे बाळ श्री श्री. बा. देव यांची प्रस्तावना लाभलेली आहे.*

आत्तापर्यंत, साईबाबा कोठून आले ? त्यांची जात कोणती ? याबद्दल पुष्कळ ठिकाणी उहापोह आणि चर्चा झाली आहे. जाता जाता मी फक्त एवढेच लिहीतो कीं परमपूज्य साईबाबा जगाच्या कल्याणासाठीं अवतरले. परोपकार, सेवा, भक्ति, त्याग यांचा समन्वय करून त्यांनी अडलेल्यांना मदत केली, चुकले त्यांना मार्ग दाखविला पिडीतांना औषध देऊन मुक्त केले. ज्याला ज्या प्रकारें समाधान होईल त्याला त्या प्रकारची गोष्ट देऊन सुखी करण्यासाठीं त्यांनी आपलें जीवन वेचलें. अशा थोर संतांची जात ! ज्याच्यापुढे गेल्यावर जातिभेद हा नाहींसा होतो, ज्याच्यापुढे गेल्यावर भेदाभेदाची भिंत ढासळून पडते, स्वत:चें आचरण शुद्ध ठेवणें, मन मत्सररहित ठेवून जीवनाचा सूर्य हा सत्यप्रकाशाने तळपत ठेवण्यासाठीं ज्यांनी आयुष्य खर्च केले, त्यांना भेदाभेद नाहींतच एकच धर्म आणि एकच सेवा त्यांना माहीत आणि ती म्हणजे 'मानव धर्म आणि मानव सेवा' 'भेदाभेदभ्रम अमंगळ' हे ज्यांनी दाखवून दिले, त्यांच्याबद्दल त्यांच्या जातीबद्दल वृथा वादविवाद करण्याचें कांहीच प्रयोजन नाहीं. त्या सार्‍याच्या पलीकडील ते होते. यावर एवढेच पुरे.

शिर्डीत साईबाबा ज्यावेळी अवतीर्ण झाले, त्यावेळी त्यांचे वय १६ ते १८ वर्षापर्यंतचे असावें (सन १८६७ च्या सुमारास ते आले असें सांगतात.) कोणी म्हणतात ते लग्नाच्या वरातीमधून आले, तर कोणी म्हणतात ते वटवृक्षाखालीच प्रकट झाले. कोठून आले, कसे प्रगट झालें, याकडे विशेष बारकाईने न पहाता, जगाला, मानवाला, जो एक उपयोग, सन्मार्ग आणि भक्ति मिळाली ती त्या विभूती पासून दृढ झाली. त्यांनी स्वानुभूतीने त्यांचा डांगोरा पिटून एकमेव सुखाची, आनंदाची किल्ली हाती आणून दिली. असा हा थोर बालसाधू खंडोबाचे देवळांत बसत असे. म्हाळसापति त्यांना 'आवो साई' म्हणून म्हणाले तेव्हांपासून त्यांना 'साईबाबा' असे लोक म्हणू लागले. श्रीसाईबाबा हे पूर्ण वैराग्यशील असून निरीच्छ व निस्पृह आणि तेज:पूंज असे योगी होते.

दु:ख, संकटें यांच्याशी झगडल्याशिवाय सुखप्राप्ती ही कधीच होत नाहीं, हें त्यांनी आपल्या रोजच्या जीवनक्रमावरून दाखवून दिलें. प्रत्येक गोष्ट ही मनापासून करा, त्याला आत्म्याची जोड मिळू द्याल, मग अपयश असें कधीच येणार नाहीं. पण याही पलिकडे जाऊन, बाबांनी आपल्या भक्तांना सुख, दु:ख हे सारे मानण्यावर आहे. 'सुखी पाहता सर्वही सुख आहे', असे पटवून दिले. ज्यावेळी माणसाजवळ सुख असते, त्यावेळी दु:ख हे त्याचेंच अंथरूणावर झोपलेलें असतें. म्हणून सुखाच्या वेळी दु:खाची आठवण विसरून जाता कामा नये. सुखात फुलून जाता कामा नये, आणि दु:खांतही चुरून जाता कामा नये. हेच





तत्त्वज्ञान श्रीसाईनी आपल्या भक्तसमुदायाला दाखवून दिलं तं सारं जीवनव्यापी असेच आहे.

शिर्डी गांवी ते कधी ओढ्याकाठीं असलेल्या लेंडीबागेंत बसत, तर कधीं अरण्यांत जाउन बसत. लहर येईल त्यावेळी गावांत येऊन भिक्षा मागून जें मिळेल तें खावे व लोकांना मदत करावी. गरीबांसाठीं झटावे, आजाऱ्यांना औषधपाणी द्यावे व त्यांची सेवा करावी. 'परदुःखीं उपकार करि, तरी मनीं अभिमान न आणिरे' या स्थितीतले श्री साईबाबा होते. अंगात अगदी साधा वेष धारण केलेला असे, कोणी कोणी तर 'वेडा फकीर' म्हणून सुद्धां संबोधित ! खरोखरच जे दुसऱ्याच्या दुःखांत मिसळतात, दुसऱ्याच्या चांगल्यासाठीं, स्वतःच्या सुखदुःखाकडे न पाहतां परोपकाराचे असिधाराव्रत ते पत्करतो. जगाच्या दृष्टीने वेडेच ठरतात, पण हे वेडे दुसऱ्यांना पण वेड लावतात, की ज्या वेडामुळें माणसाच्या अंगातील वेडेपण नाहीसें होऊन त्याच्यात खरे जीवनोपयोगी असे आनंदमय, मंगलमय सर्वव्यापी जीवनध्येय निर्माण होऊं शकते आणि तोच कैवल्यप्राप्तीचा आनंद उपभोगितो. असले वेडे निर्माण होणे देखील महाभाग्यच आहे. बाबांबद्दल 'वेडा फकीर' अशीच लोकांची कल्पना झाली होती. या सर्वांचा कळस म्हणजे, त्यांना पुढे पुढे भिक्षा घालतांना, रस्त्यांतून जाता-येताना टवाळ लोक आपली मने बिघडून घेत होती. पण याकडे पहावयाला श्रीबाबांना वेळ कुठें होता ? त्यांना जगाला वेड लावावयाचे होते. जगांत जीवनव्यापी ध्येय निर्माण करावयाचे होते. सारे एक आहे, सारे पुर्ण आहे, सारे पूर्णातून निघालें आहे व पूर्णातच जाणार आहे, हे दाखवून द्यावयाचे होते. म्हणून ज्यांनी अहोरात्र खटपट करून, सेवा करून लोकांना मार्गदर्शन केले ते हे महान संत साईबाबा होत.

सेवेचे, परोपकाराचे, त्यागाचे फळ फार मोठे असते हें बाबांनी आपल्या आचरणावरून दाखवून दिले. पणत्या लावण्यासाठी गावांत कोणी तेल सुद्धा देईनात, तेव्हा पणत्यांत पाणी घालून बाबांनी त्या वातींना तेज दिले. यांत त्यांना तरी हेच दाखववयाचे होते कीं एखादी गोष्ट आपल्या इच्छेनुसार घडली नाही की आपण निराश होऊन जातो, संकटे आली तर घाबरून जातो, निस्तेज होतो पण मन तयार असल्यावर धीराने वागण्याची तयारी असल्यावर सत्यमार्गाचा अवलंब करून जीवनाच्या ध्येयाची एकमेव वाटचाल नीट चालण्यासाठी आपोआप मार्ग मिळत जातो, सारी संकटे दूर होतात. पाण्याने सुद्धा दिवे पटू शकतात, तर मग जीवनातल्या संकटांना घाबरुन जाण्याचें कारण नाही. या वातींना जसे पाण्यानें तेज दिले. त्याचप्रमाणे वेळ पडली तर आपले हृदय आपल्यासाठी, आत्मदर्शनासाठी आणि आपल्या जीवनाच्या खऱ्या मार्गासाठी आखणी करुन देईल. त्याला दुसऱ्या कोणाकडे जावयास नको. त्याला वाचनाची, पारायणाची अगर कशाचीच जरूरी नाही. जसे तेलावाचून नुसते पाणी घालून वाती तेजावल्या. तशीच स्वानुभूतीने अंतःकरणे प्रकटू द्यात. मग सारे मिळेल. संतांना काय अशक्य असते ? कोण संत बनू शकणार नाही ? श्री बाबांनी हेच जीवन व्यापी तत्त्व, ध्येय, आपल्या आयुष्यात अनेक लहानमोठे चमत्कार करून दाखवून दिले, पटवून दिले. पण आपण लोक मात्र त्याकडे अत्यंत निराळ्या दृष्टीने पहातो. याचा अर्थ वेगळाच लावतो आणि मग पश्चात्ताप पावतो. याला जबाबदार कोण ? ते महाभाग आहेत नाही ? याला आपणच जबाबदार आहोत. याकडेच आता प्रत्येकाने पाहून आपलाजीवनमार्ग आखला तरच बाबांची भक्ती केल्याचे पुण्य मिळेल. त्यांचे जे कार्य आहे, त्यांनी जे दाखवून दिले आहे, त्याला उजाळा देणें हेंच त्यांच्या भक्तीचें मर्म आहे. मग त्यासाठी त्याला जे लागेल ते देण्यास श्रीसाईबाबा समर्थ आहेत. फळाची आशा धरून कर्म केले की उपयोग नाहीं, त्याचप्रमाणें 'भक्ती ही भक्तीसाठींच केली पाहिजे.' ईश्वराकडे काय, संताकडे काय मानवाकडे काय अगर जीवनांतल्या प्रिय गोष्टीकडे पहाताना काय, ही एकच दृष्टी निर्माण झाल्याशिवाय खरा मार्ग खरी भक्ति, खरी श्रद्धा मिळणार नाही. जीवनव्यापी ध्येयमार्गाच्या पथावर कसा प्रवेश करावा हेच श्रीबाबांनी दाखवून दिले.

卐 卐 卐

## सुविचार

**संत गाईसारखे वत्सल आहेत,**
**म्हणूनच स्वतः तत्वज्ञानाचा कडबा पचवून**
**जगाला भक्तीनीतीचे दूध**
**पाजीत असतात.**

*- विनोबा भावे*

# पुण्यश्लोक अहल्या देवींचे कार्यकर्तृत्व



– एन. एस. कुल्लुर

नवरात्र व दसरा हे देवीमहात्म्याचे मंगल पर्व आहे. महाराष्ट्रात देवींची साडेतीन पीठे आहेत. कोल्हापूर, तुळजापूर, माहूर, सप्तश्रृंगी ह्या अध्यात्मिक शक्तिदेवतांबरोबरच इतिहासात आपल्या कार्यकर्तृत्वाने अढळस्थान प्राप्त झालेल्या राजमाता जिजाबाई, राणी लक्ष्मीबाई आणि पुण्यश्लोक अहल्या देवी यांचे पुण्यस्मरण आजच्या काळात अधिक संयुक्तिक ठरावे. या दृष्टिने आम्ही या दसरा विशेषांकांत पुण्यश्लोक अहल्यादेवीच्या कार्याचे शब्द दर्शन घडवित आहोत. चालू वर्ष हे अहल्या देवींच्या २०० व्या पुण्यतिथीचे स्मरणवर्ष आहे.





**॥दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम् ॥**

(जन्म घेणे दैवहाती असले तरी जन्माचे सोने करणे माणसाच्या हाती असते.)

पूर्वजांचे पराक्रम, त्यांची चांगली वाईट कृत्यें आणि त्यांनी आचरणरुपाने मागे ठेवलेल्या संदेशापासुन माणसांना बोध घेण्यासारख्या अनंत गोष्टी असतात. मध्य भारताचा प्राचीन सम्राट राजा विक्रमादित्य सर्वांना सुपरिचित आहे. तशीच त्याची राजधानी उज्जैन. विक्रमादित्य हा त्याच्या नि:पक्षपाती न्यायादानाबद्दल विश्वविख्यात आहे. त्याचे चारित्र्य व चरित्र सर्वांना बोधप्रद व अनुकरणीय आहे. तसाच प्रकार पुण्यश्लोक, प्रात:स्मरणीय लोकमाता, देवी अहल्याबाई होळकर यांच्या दिव्य, सात्विक चरित्र व चारित्र्याबद्दल म्हणता येईल. अहिल्याबाई होळकर या ज्ञात इतिहासातील एकमेव अशा विभूति होत की ज्यांना सर्व श्रेष्ठ जन परमेश्वराला जी विशेषणे लावून नाव उच्चारतात तसे देवी, पुण्यश्लोक, लोकमाता, प्रात:स्मरणीय इत्यादि दैवीगुणयुक्त विशेषणे लावल्याशिवाय उच्चारित नाहीत. यावरुन त्या 'ईश्वरीय अवतार' (इनकार्नेशन ऑफ डिव्हीनिटी) होत. मराठ्यांचा मावळ्याचा व मध्य भारताचा इतिहास लिहिणारा सर जॉन माल्कम त्यांना 'ईश्वरीय अवतार' म्हणतात. हे नाईलाजाने नमूद करावे लागले. त्याने द्विखंडात लिहिलेल्या 'ए मेमॉयर ऑफ सेंट्रल इंडिया, इनक्लुडींग माळवा अँड अॅडजॉइनिंग प्रॉव्हिन्सेस' मध्ये होळकर व शिंद्याचा इतिहास विकृतपणे हेतुपुरस्सर लिहिलेला आहे. (संदर्भ तिसरी आवृत्ती १८८० थॅकर स्पिंक अँड को. कलकत्ता) अहिल्यादेवींना हा जो लोकोत्तर हृदयस्थ सन्मान मिळतोय तसा सन्मान व प्रेमादराचा उल्लेख सम्राट अशोकालाव तो काय तेवढा मिळालाय. शांतताप्रिय अशोकचा उल्लेख 'देवानाम् प्रिय' केल्याचे पदोपदी प्रत्ययास येते.

देवींच्या हयातीतच त्यांना संतत्व लाभले. सर्व प्रजाजन व ब्राह्मणमंडळी त्यांना ईश्वरी अवतार मानीत. पण देवींच्या अलौकिक व्यक्तिमत्वास पैलु कोणी पाडले ? तो हिरा कोणी पारखला ? तर ती महनीय, युगप्रवर्तक, अप्रतिम रणधुरंधर व्यक्ती म्हणजे होळकर घराण्याचा संस्थापक व भाग्यविधाता मल्हारराव खंडोजी होळकर होय. यांचे जन्मगांव होळ. ते फलटण परगण्यांत होते. निंबाळकरांची जहागिरी त्यावेळी होती. फलटण ते होळ अंतर पाच कोस. तर पुण्यापासुन वीस कोस. (१ कोस = ३ मैल अंदाजे) त्यांचे वडिल खंडोजी मल्हारी चार-पांच वर्षाचा असतांनाच स्वर्गवासी झाले. त्यामुळे आई व मल्हारी खान्देशातील तळोदा गांवी त्यांचे मामा नारायणजी बारगळ यांचेकडे गेले. तेथे मामाबरोबर ते सरदार कदम-बांडे यांच्या घोडदळांत समाविष्ट झाले. तरुण, तडफदार मल्हारीमध्ये आदर्श योध्यास आवश्यक असणारे सर्व गुण उपजतच होते. निजाम्-उल्- मुल्कशी झालेल्या पहिल्या वाहिल्या युद्धातच मल्हारीने अतुलनीय पराक्रम गाजविला व शत्रुपक्षातील सेनाधुरंधराला यमसदनास पाठविले. या शौर्यावर खूष होऊन बारगळमामांनी आपली कन्या गौतमाबाई हिला मल्हाररावास देऊन जावई बनवून घेतले. यानंतर मल्हाररावांची शौर्यगाथा सतत वर्धिष्णुच राहिली. त्यांची कीर्ती व शौर्य पहिल्या बाजीरावांना कळली. त्या काळात मराठा फौज व रणधुरंधर सरसेनापती बाजीरावांचे नांव ऐकताच महापराक्रमी बाजीराव पेशव्यांनी मल्हाररावांना आपल्या सेनेत समाविष्ट करुन घेतले. त्यांना एकदम पांचशे घोडदळाचा प्रमुख केले बाजीराव पेशव्यांनी ! मग बाजीरावांनी मल्हाररावांना धाडसी व पराक्रमी चिमाजी अप्पाबरोबर कोंकण मोहिमेवर धाडले. दोन्ही धीरोधात वीरानी पोर्तुगीजाना युद्धात धडा शिकवून त्यांच्याकडील प्रदेश जिंकून घेतला. तदनंतर निजाम्-अली-खानशी झालेल्या त्यांच्या वागण्याने मल्हाररावांची कीर्ति अत्यंत वेगाने वाढली. त्यामुळे नर्मदेच्या उत्तरेकडील बारा जिल्हे व आणखी सत्तर ते ऐंशी जिल्हे त्यांना पेशव्याकडून १७२८ ते १७३१ दरम्यान प्रदान करण्यात आले. १७३३ साली बाजीराव पेशव्यांनी त्यांना ''सुभेदार'' हा किताब बहाल केला. या वर्षी, १४ मे १७३३ साली चौंडीचे पाटील (पाथर्डी- पाटोदा भाग) माणकोजी शिंदे यांची लोकविलक्षण कन्या अहल्या त्यांची सून झाली.

## 'काका' मल्हारबाबा

नानासाहेब- पहिले बाजीराव- मल्हाररावांना 'काका' म्हणुन सन्मानाने व आदराने संबोधित. मल्हाररावांचे शौर्य आणि मुत्सद्देगिरी दोन्ही मराठी दौलतीच्या कामी अखंडपणे परमस्वामी निष्ठेने चाळीस वर्षे राबली. त्यांचा दबदबा पेशव्यांनाही वाटत होता. मल्हारबाबा काका देखील ममत्वानं व वडिलकीच्या नात्यानं आपला हा हक्क पेशव्यांच्या दरबारात जेष्टात्वाचा मान होळकरांचाच होता.

त्यांना लाभलेल्या वयाच्या शाहत्तर वर्षांपैकी त्यांनी सतत चाळीस वर्षे मराठी दौलतीच्या सेवेत अत्यंत उच्चकोटीची स्वामीनिष्ठा दाखविली. त्यांच्याइतका वखाणण्याइतका रणधुरंधर व साध्यासरळ व ममत्वाने राज्य करणारा दुसरा महनीय सरदार मराठा संघराज्यांत त्या काळात झाला नाही असे सर जॉन माल्कम लिहितो की, जेव्हा जेव्हा एखादा शिपाईगडी अतुलनीय शौर्य रणांगणांत गाजवी तेव्हा तेव्हा सुभेदार मल्हारराव आज्ञा देत की 'अरे या शूराची ढाल रुपयांनी भरा बर !' हाच असामान्य न्याय ते सर्व शिपाईगड्यांना लावीत.

पेशव्यांच्या प्रति त्यांची स्वामिनिष्ठा अत्यंत विनम्रपणाची असे. त्यांची व पाटीलबा महादजी शिंदे यांची तुलना करतांना माल्कम लिहितो की, मराठी संघराज्यासाठी जे जे कार्य मल्हारराव करीत





ते हृदयातील आत्मियतेने करीत तर महादजी शिंदे तेच काम डोके वापरुन करीत. मल्हारराव हे अत्यंत बाळबोध व स्वामिनिष्ठ योद्धे होते तर महादजी शिंद्यामध्ये धूर्त राजकारणी, व्यक्तीचे सर्व कावेबाज गुण आढळत. यावरुन होळकर व शिंदे यांच्या राजकीय वागणुकीतील फरक सूज्ञांच्या ध्यानात यावा.

## देवी अहल्या; दैवी गुणांचा वसा

महापराक्रमी व पराकोटीचे स्वामिनिष्ठ व उदारतेचा पुतळा असणारे मल्हारराव हे देवी अहल्याचे सर्व क्षेत्रांत आदर्श होत. सासरे सून म्हणजे असीम त्यागी वृत्तीचा अवतारच जणू ! जगप्रसिद्ध स्वामी विवेकानंदाचें गुरुवर्य श्री रामकृष्ण परमहंस यांचे जे स्थान आहे तेच स्थान मल्हाररावांचे देवी अहल्या यांच्या दैवी चारित्र्यात आहे. लोकमाता अहल्या म्हणजे औदार्याचा पुतळा ! धर्मप्रणित सदाचरणाची चालती बोलती मानवी मूर्ती अहल्या ! शांतीब्रह्म - रणचंडी अहल्येने या सर्व दैवी गुणांचा वसा आपल्या युगप्रवर्तक श्वसुरांकडून घेतला. त्यामुळे सबंध होळकरशाहीचा तेजस्वी इतिहासात देवी अहिल्यांचे नाव अढळ ध्रूवताऱ्याप्रमाणे तेजाळते आहे. पण त्या ध्रूवताऱ्याच्या अखंड प्रकाशाचे उगमस्थान मल्हाररावांच्या चारित्र्यांत आढळते.

## देवी अहल्येचा विवाह

महान पराक्रमी मल्हारराव होळकर मराठवाड्यातून लष्करी मोहिम फत्ते करुन माळव्याकडे परतत होते. सैन्याची छावणी चौंडी गावाजवळ पडली होती. एके दिवशी एक परम तेजस्वी बालीका शिव मंदिरात जातांना सुभेदारांनी पाहिली. तिची धिटाई व चापल्य पाहून सुभेदार अत्यंत प्रभावित झाले.तिने शंकरास बेलपत्र वाहले. जणू काही तिच्या पुढील ४०-५० वर्षाची अजरामर कालखंडाची सत्यम् शिवम् सुन्दरम्‌ची नांदीच जणू ! त्यांनी रीतसर अहिल्येस सून म्हणुन मागणी घातली. अशा प्रकारे शिंद्यांची ही पोर होळकरांची अद्वितीय कीर्तीसंपन्न सून बनून माळव्यात गेली. अशा तऱ्हेने माणकोजीचे हे माणिक होळकरांच्या कनकाच्या कोंदणात बसले पति खंडेरावांविषयी अपार श्रद्धा व सेवावृत्ति बाळगून देवी अहल्या इंदुरास आल्या. याचवर्षी मल्हाररावांना 'सुभेदार' हा किताब पेशव्याकडून मिळाला. मल्हारबाबांना तिचा हा उत्तम पायगुण वाटला. अशा तऱ्हेने देवी अहल्येच्या व्यक्तिमत्वाच्या परिसस्पर्शाने दोन्ही कुळे अजरामर झाली. पावन झाली. पति खंडेराव किंचित व्यसनाधीन होते. त्यामुळे तेजस्वी जाज्वयुक्त धर्मरत देवी अहल्येप्रत त्यांना आदरयुक्त दरारा वाटे. देवी अहल्येचे व्यक्तिमत्व लोकविलक्षण होते. मल्हाररावांनी त्यांच्यावर पुत्रासारखे प्रेम केले. त्यांनी त्यांच्या व्यक्तिमत्व जडण घडणीवर लक्ष केंद्रित केले. सासूबाई गौतमबाई याही परम धर्मनिष्ठपणे वागणाऱ्या होत्या. अशा प्रकारे सासर-सासूबाईचे सुंस्कार अहल्यादेवीवर झाले. दोघांचे सर्व सदगुण देवी अहल्येने प्रेमाने, निष्ठेने व



आस्थेवाईकपणे आत्मसात केले. अशाप्रकारे मल्हारराव व गौतमबाईंनी अहल्यानामक लोकोत्तर नैतिकतेचा महान आदर्श घडविला. याच काळात धार्मिक व्रतवैकल्य, उपास-तापास, नित्यनेमाने पोथीपुराण श्रवण करणे यातून देवी अहिल्येचे असामान्य व्यक्तिमत्व आकार घेत होते. माल्कमनी मल्हाररावांची तुलना यथार्थपणे जगप्रसिद्ध कार्येजिमन सेनाधुरंधर, अतुलनीय पराक्रमी सेनाधुरंधर, अतुलनीय पराक्रमी हॅनीबॉलशी केली आहे. सासरे मल्हारराव देवी अहल्येला युद्धांच्या मोहिमेवर जातीने नेत. याद्वारे त्या युद्धशास्त्रात व युद्धनीतीत पारंगत झाल्या. त्यांनी अत्यंत डोळसपणे व तरलबुद्धिने होळकर घराण्याचा खाजगी दौलतीचा कारभार व जमाखर्च आत्मसात करुन घेतला. यावर कळस म्हणजे सदगुरू ब्रह्मेंद्रांच्या कृपेने व सदुपदेशाने देवी अहल्येचे मन व आचरण सुसंस्कृत व धर्मनिष्ठ बनले यात नवल ते कसले ? अन् म्हणुन -

**'दोन कुळांची कुलदीपक ती**
**पुरुष नसुनही पुरुषच होती '**

अशा या असामान्य स्त्रीच्या पोटी १७४५ मध्ये भालेराव पुत्ररत्न जन्मले. तर १७४८ साली मुक्ताबाई हे कन्यारत्न निपजले. संसारवृक्ष सार्थपणे सर्वांगानी बहरला. सर्वत्र आनंदाचे आवारु झाले होते. सुखास दृष्ट लागावी असा हा काळ होता देवी अहिल्येचा जीवनातला.

## न्यारी दैवगती

परंतु ईश्वरी नियोजन व संकेत वेगळ्याच वाटेने जात होते. त्याचा प्रथम वज्राघात १९ मार्च १७५४ मध्ये साध्वी अहल्यांना बसला. सुरजमल जाटाने युद्धाचा प्रसंग आणला. होळकरांवर. कुंभेरीचा रणसंग्राम. मल्हाररावासंह खंडेराव लढाईत होते. दुर्दैवाने तोफेचा गोळा लागुन खंडेरावांना वीरगती प्राप्त झाली. त्या काळच्या निर्दय व अमानवी प्रथेनुसार देवी अहल्यांनी सती जाण्याचा निश्चय सासऱ्यांना कळविला. देवी अहिल्या म्हणजे





धर्मशास्त्रप्रणीत सर्व नियमांचे पालन करणारी महामानवीशक्ती ! ज्या उच्चवर्णीयांनी सतीची प्रथा आणली त्या वर्णातील स्त्रिया सती गेलेल्या उदाहरणांची संख्या बोटावर मोजण्याइतकी. पण होळकर घराण्यांत हा नियम पाळण्याचा कळस झालेला दिसुन येतो. अहिल्यादेवींच्या मनोदयाच्या नेमकी उलट प्रतिक्रिया दूरदृष्टी असणाऱ्या धोरणी मल्हाररावांची होती. त्यांना माळवा व मध्यभारतातील होळकरांची-मराठ्यांची प्रचंड दौलत सांभाळणारी तारणहार देवी अहिल्या सती जाऊ नये असे मनापासुन वाटत होते. युगप्रवर्तक मल्हाररावांनी मोठेपणाचा व वडिलकीची मान पटकन् बाजूस सारला. सासरेपण विसरले ते. आर्तपणे व सद्‌गदित होऊन त्यांनी आपल्या सुनेस तळमळीने विनविण्यास सुरुवात केली :

**''अहिल्ये नको उन्हाळा करू**
**पतिनिष्ठेने जाशिल जर सती**
**मम राज्याला कोण मागुती ?**
**पुत्रच तू मज, माझ्यापुढती**
**नको आसवे नयनी भरू.**
**कींव येऊ दे म्हाताऱ्याची**
**बात सोड तू सहगमनाची**
**हातात सूत्रे घे राज्याची**
**नाव लागू दे पुढे तरू.''**

समरकवी रंगनाथ जोशी

देवी अहिल्यांनी सती जाण्याचा निर्णय श्वसुरांच्या विनवणीमुळे रद्द केला आणि त्यांना महाराष्ट्र वाल्मिकी ग.दि. माडगुळकरांनी म्हटल्याप्रमाणे

**'जरामरण यातुन सुटला कोण प्राणिजात ?**
**दु:खमुक्त जगला का रे कुणी जीवनात ?'**

असा साक्षात्कार झाला असणारच ! त्यांचे जीवन म्हणजे साक्षात्कारशास्त्राला आव्हानच आहे संशोधनाचे ! म्हणुन देवी अहिल्यांना यक्ष प्रश्न पडला असावा :

**'जिवासवे जन्मे मृत्यु, जोड जन्मजात**
**दिसे भासते ते सारे विश्व नाशवंत**
**काय शोक करिसी वेड्या,**
**स्वर्प्निच्या फळांचा ?'**

आणि या प्रश्नाच्या उत्तराचा कौल महान संत तुकोबाराय म्हणतात- त्याप्रमाणे -

**'वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा,**
**येरांनी वाहावा भार माथा ॥**
**तुका म्हणे आले आपणचि फळ,**
**हातोहाती मूळ सांपडले ॥'**

देवी अहल्यांना लागला असावा. त्यांनी मराठी दौलतीची विश्वस्त म्हणुन नि:स्पृहपणे सांभाळण्याचा वज्रनिर्धार केला. प्रजेला मातेच्या वात्सल्याने जोपासण्याचे ठरविले. त्यांनी सती न जाण्याचा व निर्दय धर्मशास्त्राचा क्रूर नियम जनहितार्थ न पाळण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे मल्हाररावांना झालेला आनंद कसा वर्णावा ? आणि म्हणुन जर मल्हाररावांनी अहल्यादेवींचे लोकोत्तर दैवी गुण पारखले नसते तर काय ओढवले असते ? हा प्रसंग उद्‌भवला नसता तर भारतवर्ष देवी अहल्या नामक मानवी कोहीनूर हिऱ्यास मुकला असता.

**'आपद: सन्तु न: शश्वद्यासु संस्मर्यसे हरि:'**
**- कुंती**
(हे प्रभो ! आम्हांवर दु:खाचे डोंगर कोसळोत, म्हणजे आम्ही सतत तुझी आठवण करू.)

पतिनिधनोत्तर काळात देवी (अहल्यांच्या जीवनांत दु:खाची अखंड मालीकाच कोसळू लागली. त्यांचे व्यक्तिमत्व दिव्य होते. त्या साक्षात्कारी संतच होत्या. त्यामुळे तुकोबारायांनी म्हटल्याप्रमणे 'जगास खाणाऱ्या काळाच्या माथ्यावर त्यांनी पाय दिला' त्यांनी. त्यासाठी त्यांना आत्मिक शक्ती लाभली ती.

**'न मिळो खावया न वाढो संता ।**
**परि हा नारायण कृपा करो ॥**
**ऐशी माझी वाचा मन उपदेशी ।**
**आणीक लोकासी हेचि सांगे ॥**
**विटंबो शरीर होत का विपत्ती ।**
**परि राहो चित्ती नारायण ॥**
**तुका म्हणे नाशिवंत हे सकळ ।**
**आठवे गोपाळ तेचि हित ॥'**

याची पूर्णांशाने अनुभूती लाभल्यावर. म्हणुन देवींनी समचित्तत्ववृत्तीने -

**'देव जोडे ते करावे अधर्म ।**
**अंतरे ते कर्म नाचरावे ॥'**

हा निर्ण उर्वरित आयुष्यात पाळण्यासाठी घेऊन टाकला. ते त्यांनी आजन्म पाळले. त्यांच्या या लोकविलक्षण उत्तुंग नैतिक वागणुकीमुळे त्यांचा उल्लेख कोणीही ''देवी'' म्हणुनच करतो. यावरुन त्यांच्या विभूतिमत्वाची कल्पना यावी. महान इतिहासकार एच् जी. वेल्स याने आपल्या 'ॲन औटलाईन ऑफ वर्ल्ड हिस्टरी' या ग्रंथात शांतताप्रिय, महात्मा गौतमबुद्धांचा महान अनुयासीसम्राट अशोकावर स्तुतिसुमनांचा वर्षाव केला आहे. जर वेल्समहोदयांनी देवी अहिल्येच्या नि:स्पृह व अतुलनीय जनसेवाव्रताचे परिशीलन केले असते तर त्यांनी सम्राट अशोकपेक्षा अधिक गुणगान देवी अहिल्येचे केले असते.

३ जून १७६६ ला देवींचे पुत्र मालेराव हे होळकरांच्या गादीवर विराजमान झाले. यापूर्वीच २९ सप्टेंबर १७६१ साली सासूबाई गौतमाबाई स्वर्गवासी झाल्या. २० मे १७६६ ला त्यांचे सासरे, होळकर घराण्याचे संस्थापक, मल्हाररावजी पंचत्वात विलीन झाले होते. यात भर म्हणुन की काय गादीवर येवुन वर्ष लोटण्यापूर्वीच २७ मार्च १७६७ साली राजे मालेरावांचा दुर्दैवाने विपरीत अवस्थेत अंत झाला. पतिबरोबर मालेरावांच्या दोघी बायका सती गेल्या. हे सर्व दु:खाचे डोंगर देवींनी लीलया झेलले. त्यांची आत्मिक शक्ती अचाट होती. त्या पुन: नव्या जोमाने राज्यशकट सांभाळण्यास कटिबद्ध झाल्या.





## वीररत्न तुकोजीराव होळकर

लक्ष्मणपत्नी उर्मिलेच्या त्यागाची जगास फारशी माहिती नाही. तेच भाग्य तुकोजीराव होळकरांच्या वाट्यास आलेले आहे. अहल्यादेवीच्या कारकीर्दीस सुवर्णपण आणण्याचे कार्य अत्यंत सौजन्याने, शांतपणे व निष्ठेने करणारी व्यक्ति म्हणजे शूराग्रणी तुकोजीराव ! महासाध्वी देवी अहल्यांचा कीर्तीध्वज सतत वर्धिष्णु ठेवणारे निःस्वार्थ व्यक्तिमत्व ! जगावेगळी स्वामीनिष्ठा या रणधुरंधर सेनापतीजवळ होती. त्याचबरोबर प्रशांतता व लीन वृत्तीही ! ते वयाने वडिल असूनही देवी अहिल्यांना सदैव 'माता' च संबोधित असत. त्यांनी देवींची आज्ञा सतत कुलधर्माप्रमाण झेलली. आज्ञापरिपूर्तीसाठी स्वतः व जीवन त्यांनी समर्पित केले. त्यांनी म्हणजे तन-मन-धनाची-मखमली पायघडी घालून देवी अहिल्याची कीर्ती व मानसन्मान कसा वाढेल याची सक्रिय चिंता आजन्म वाहिली. किंबहुना देवी अहिल्यांची कीर्ती अलौकिक व दिगंत करण्यात या शानिवंत सेनापतींचा सिंहाचा वाटा आहे. सर जॉन माल्कमने तुकोजीरावांना अत्यंत स्वामीनिष्ठ, बाळबोध वळणाचे, साध्यासरळ मनाचे शिपाईगडी म्हटले आहे. हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडात तानाजी मालुसरे, बाजीप्रभु देशपांडे, मदारी मेहतर आणि जिवा न्हावी इत्यादिंचे अमूल्य बलिदान जसे ऐतहासिक महत्त्वाचे तसेच तुकोजीरावांचे त्यागी व संयमी जीवन ओजस्वी आहे. या संदर्भात अधिक ऐतिहासिक साधने, पुरावे उपलब्ध होणे आवश्यक आहे. म्हणजे त्यांचा एक नवा इतिहास साकार होईल. देवी अहल्यांनी १० जून १७६७ साली तुकोजीरावांना पेशव्याकडून होळकरी व पेशवाईच्या फौजेची वस्त्रे मिळवून दिली. देवींनी निश्चित मनाने तुकोजीरावांवर होळकर दौलतीची देखभाल व पेशव्यांच्या चाकरीची सर्व लष्करी जबाबदारी सोपविली. अन् विशेष म्हणजे ती आजन्म प्रखर निष्ठेने पाळून त्यांनी देवींचा विश्वास सार्थ करून दाखविला. अहल्यादेवीच्या राजकारणाची, धर्मकारणाची, दानधर्माची न्यायदानाची जी सुवर्णमय तीस वर्षे होती ती दिव्य होती. त्यांच्यातील लोकविलक्षण समन्वय शोधुनही सापडणार नाही. या संबंधावर लिहू गेल्यास अनेक प्रबंध होतील.

## कुबेरसम धनद्रव्यावर तुलसीपत्र

देवीचे पुत्र होळकर सिंहासनस्थ झाले. त्याकाळी धन-द्रव्य-जड-जवाहिरांची प्रचंड दौलत खजिन्यात होती. मनात आले असते तर त्याचा वाटेल तसा ऐषआरामासाठी उपयोग करता आला असता. पण देवींचे मन किती विशाल ! किती व्यापक ! त्यांनी धर्मशास्त्र संमत विधीनुसार देवा-ब्राह्मणांसमक्ष या प्रचंड धनद्रव्यावर तुळसीपत्र वाहिले. ती सर्व धनदौलत ''वरं जनहितं ध्येयम्' साठी



वापरली. हा पैसा, त्याचे ममत्व, दूरदृष्टी व स्वर्गीय विधायक कार्य म्हणजे त्यांनी अखंड भारत वर्षभर सर्वत्र भव्य मंदिरे, तीर्थयात्रेकरुसाठी धर्मशाळा, बारव, विहीर, घाट, अन्नछत्रे, काशी ते रामेश्वर गंगाजळ कावड इत्यादी अखंडपणे चालू राहतील अशी चिरतन व्यवस्था लावुन दिली. या सर्व दानशूरतेची पावती आजही सर्वसामान्य जनता मुक्तकंठाने अहिल्यादेवींनी बांधलेले मंदिर घाट, बार असा उल्लेख करते. यावरुन जनतेची मने त्यांनी त्यांच्या पवित्र व चिरमंगल कार्यकुशलतेने जिंकली आहेत. हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. जसे तुकारामांचे अभंग न वाचताही लोकांच्या स्मरणात व आचरणात सहजगत्या असतात तसे देवी अहिल्यांचे नांव सर्वतोमुखी त्यांच्या अक्षय-सक्रिय कार्याने झाले आहे. यामुळेच त्यांने नांव प्रथम 'देवी' हे विशेषण लावूनच उच्चारण्याची सामाजिक प्रथा आहे.

## राजधानी महेश्वर : अप्रतिम शिल्पकला

विशाल नर्मदामाईच्या काठावर वसलेले महेश्वराला देवी अहिल्यांनी राजधानी केली. हाही एक संशोधनाचा विषय आहे. हे स्थान अत्यंत प्रेक्षणीय आहे. नर्मदेचे विमलजल आत्मशांतीदायक आहे. हे ठिकाण जगाच्या कोलाहलापासुन दूर आहे. हिमालयातील ऋषींच्या आश्रमासारखे विलक्षणरित्या पवित्र व साधेपणाचे माहेरघर! इथुनच जवळ नर्मदेची ''सहस्त्रधारा'' आहे. ज्या सहस्त्रार्जुनाने नर्मदामाईस हजारो बाहूंनी आडविले तसे देवी अहिल्यांनी महेश्वर राजधानीत राहून सामन्यजनांची दुःखे स्वतःच्या दानरुपी हजारो हस्तांनी रोखुन धरली असे प्रत्ययास आल्याशिवाय राहणार नाही. आयुष्यांत सतत व नेमाने संकटे कोसळत असतांना देवी अहिल्या आपल्या चित्ताचे चैतन्य व समतोलपणा टिकवून राहू शकल्या. त्याचे एकमेव कारण म्हणजे पवित्र महेश्वराचा अगाध महिमा. महेश्वरच्या नर्मदातीरावर राहून प्राचार्य अनंत पोतदार म्हणतात त्याप्रमाणे -





**शक्ति सिद्धि जय यश लाभाया अद्वितीय**
**जो तरुणोपाय ।**
**पांच अक्षरी मंत्र आळवी नम: शिवाय**
**ॐ नम: शिवाय ॥'**

या सात्विक सामर्थ्य प्राप्तीमुळे देवी अहिल्यांना राजकारणासारख्या क्लेशदायक क्षेत्रात लिलया व सतत विजगीषुवृत्तीने संचार करता आला. त्यांनी सहस्त्र मानवीयता योगसम्राट ज्ञानेश्वरांनी बाराव्या अध्यायांत वर्णिल्याप्रमाणे -

**उत्तमाते धरिजे । अधमाते अव्हेरिजे ।**
**हे कहि चि नेणिजे । वसुधा जेव ॥१४४॥**
**रायाचे देह चाळू । रंका परौते गाळू ।**
**हे नेणेचि कृपाळू । प्राणु पै गा ॥१४५**
**गाईची तृषा हरू । व्याघ्रा विष होऊनि मारू ।**
**हे नेणेचि करू । तोय जैसे ॥१४६॥**
**घरिचया उजियेड करावा ।**
**पारखेया आंधारू पाडावा ।**
**हे न म्हणे चि पांडवा ।दीपु जैसा ॥१४७॥**

अशी विश्वव्यापक बनली. याचे कारण महेश्वर-नर्मदेचा पवित्रकारक परिसर ! येथील नर्मदेवरील घाटाशी श्रीक्षेत्र काशीचेही घाट स्पर्धा करू शकत नाहीत. घाटावरील अत्यंत सूत्रबद्ध मंदिरे व एकूणच सर्व स्थापत्यशास्त्रीय गोष्टी मति गुंग करुन टाकतात. तेथे ज्या ठिकाणी देवी अहल्या विराजमान होऊन निसर्गाचे अवलोकन करीत त्या ठिकाणी आपण गेल्यास तशी अनुभूती कोणालाही आजदेखील येते. हे सविनय नोंदवावेसे वाटते. विशाल निसर्ग, अथांगपाणी नर्मदामाईचे, अनंत आकाश, सूर्यचंद्रादिचे तेज हे माणसास सदैव नवन्मोषशालींनी स्फूर्ती व प्रतिभा प्रदान करीत असताल. तसा तो देवी अहिल्यांना महेश्वराला प्राप्त होत असल्यामुळे त्या दिव्य ठरल्या.

**भगवा झेंडा अटकेपार फडकविणारे शूर राधोबादादांचे बायकी कृत्य व त्यास देवींचे पौरुषी उत्तर :**

१७६७ च्या सुमारास देवी अहिल्यांच्या जीवनाला दिव्यत्व व सुवर्णत्व आणणारी घटना घडली. या घटनेतील त्यांची निर्णयशक्ती व स्वत:चा प्रचंड आत्मविश्वास दिसून येतो. होळकर घराण्याचे संस्थापक नुकतेच स्वर्गवासी झाले होते. महादजी शिंदे-पाटीलांचा मुत्सद्दीपणा पेशवे दरबारी वाढला होता. राधोबादादांची मनमानी वृत्ती चौखूर उधळत होती. ते माधवराव पेशव्यांचे ऐकत नसत. प्रचंड अशा होळकरशाहीची स्वामिनी एक बाई होती. अशा संधिकाळात होळकरांचे प्रामाणिक दिवाण गंगाधरपंत चंद्रचूड यांच्या मनात विश्वातघातकीपणाचा प्रवेश झाला. या गंगाधरपंतांना दैवीगुणसंपन्न युगप्रवर्तक देवी अहल्यांच्या गुणांची व महानतेची महति अजिबात कळली नव्हती. त्याने साधा सरळ धूर्त कोल्ह्याप्रमाणे कारस्थान रचले. त्यांनी राधोबाकरवी होळकरशाही गिळंकृत करण्याचा घाट घातला. या कृष्णकृत्यांत त्याला सिंहाचा वाटा मिळावा असा त्याचा होरा होता. त्याच्या अविवेकी व गद्दारीच्या मोहपाशांत राधोबादादा अडकले. त्यांनी देखील माधवराव पेशव्यांची अनुमती या कार्यासाठी घेतली नाही. परंतु हा कट पूर्णत्वास जाण्यापूर्वीच त्याची बातमी देवी अहल्यांना समजली. त्यांचा सात्विक राग उफाळून आला. एका ब्राह्मणाने असा कट रचावा हे त्यांना सहन झाले नाही. एरव्ही त्या ब्राह्मणांना देवापेक्षाही जास्त मानणाऱ्या ! पण त्यांनी हा बांका प्रसंग तत्परतेने ओळखला. हृदय अत्यंत कठोर केले. त्यांनी अत्यंत त्वरेने निर्णय घेऊन विश्वासघातकी गंगाधरपंतांना कैदेत टाकले. तातडीचा खलीता राधोबाकडे रवाना केला.

**'दूत बाईचाही गेला । आणि म्हणे राधोबाला ।**
**व्हावे सज्ज लढाईला । आम्ही दावू हिमतीला ।**
**जय करुनिया गेला । तरी बाईवरी केला ।**
**जरी पराभव झाला । तरी बाईनेच केला ।'**

देवी अहिल्यांच्या या रूद्रावतारामुळे

**'राघोबा खजील झाला । जय बाईचाच झाला ।**
**शिंदे आणि पेशव्याला । इंग्रज नि मोगलाला ।**
**निजाम नि इतराला । बाईचाच धाक झाला ।**
**कीर्तीगंध दूर गेला । अहिल्येचं नांव झाले ।'**

अशा तऱ्हेने मर्दानी होऊन ... ान शूरांना जन्मभर याद राहील असा धडा देवींनी शिकविला.

## बेईमानी गंगाधरपंत

कालौघांत देवी अहल्यांनी गंगाधरपंताना उदार अंत:करणाने क्षमा केली. त्यांना सेवेत रूजु करून घेतले. यावर देवी अहल्येचे उतराई त्यांनी व्हावयला हवे होते. त्याऐवजी त्यांनी नेवासा क्षेत्री मोहनीराजाचे मंदिर बांधुन पापक्षालन करून घेतले. त्याऐवजी त्यांनी देवी अहिल्येचे मंदिर वा स्मारक उभारायला हवे होते. पण भारतीय धर्मकारणात उचवर्णीयांची कृष्णकृत्ये अशा धार्मिक बाबीखाली झाकली जातात. इतिहासांत त्यांच्या बेईमानीचा उल्लेख नाही. मात्र मंदिर उभारल्याचा दाखला आहे.

महाप्रतापी शिवरायांनी आपल्या हिंदवी राज्याची प्रशासनाची घडी जशी उत्तमपणे बसविली होती तशीच अहल्याबाईची होती. देवी अहिल्यांनी इंदूर सुभ्याचे ११ प्रांत केले होते. त्याचप्रमाणे महाल, परगणे व गांवचे विभाग केले. प्रशासनांत त्यांची नैतिक जरब वाखाणण्याजोगी होती. त्या सर्वांच्या हक्कांचे मातेच्या ममतेने संरक्षण करीत. या संदर्भात वानगीदाखल एका घटनेचा उल्लेख करावासा वाटतो. इंदुरचा एक धनाढ्य सावकार देवीचंद निपुत्रिक वारला. म्हणुन त्यांच्या प्रशासकीय अधिकाऱ्याने त्यांची दौलत सरकारजमा करण्याचा घाट घातला. म्हणुन देवीचंदच्या विधवा पत्नीने तिचे गाऱ्हाणे अहल्यादेवीकडे नेले. देवी अहल्यांनी सुयोग्य निर्णय दिला. देवीचंदची दौलत



त्याच्या पत्नीच्या हवाली केली. या महामनाच्या कर्तव्यदक्ष विशालहृदयी साध्वीने राज्याचे महसुली उत्पन्न त्याकाळी सालीना १६ लाख होते ते एक कोटीवर नेले. ही कामगिरी कोणचेही शोषण न करता केले त्यांनी. मेणाहून मऊ असणाऱ्या देवी प्रसंगी वज्रामेक्षा कठीण भिल्ल अन् गोंडाच्या बंडाळीचा त्यांनी स्वत: जातीने लक्ष घालून बिमोड केला. भद्रपसिंगासारख्या लुटारू बंडखोरास देहदंड दिला. या अति कठोर शिक्षेमुळे इतर सर्वांना जरब बसली. ते तसे होते कारण त्यांच्या न्यायप्रणाली पाठीमागे त्यांचे अमोल नैतिक अधिष्ठान होते. देवी अहल्यांनी राजाज्ञा व धर्माज्ञा यांचा उत्तम सुवर्णमध्य साधला. ममता, तन्मयता दक्षता आणि क्षमता लोकहितार्थ व विकासार्थ कारणी लावून उत्तम व आदर्श राज्यकारभार केला. त्यांनी रामपुऱ्याच्या चंद्रावतांचे बंड सहज मोडून काढले. त्यावर बाराभाईचे प्रमुख नानाफडणीस मत प्रदर्शन करतांना म्हणाले की, 'शापदपि शरदपि अहिल्याबाई !' देवींच्या अंगी क्षात्रतेज व युद्धोत्साह प्रचंड प्रमाणात ओसंडून वाहात होता.

## अखंड संकटे

उपरोक्त उत्तम व आदर्श प्रशासन काळातही दुर्दैवाने त्यांची साथसंगत करावयाचे सोडले नव्हतेच. १७६७ साली मुक्ताबाई फणसेना धोंडिबा उर्फ नथ्याला नावाचे पुत्ररत्न लाभले. त्यांचे लग्न १७८० साली झाले. परंतु हा दुर्बल नातू १५ नोव्हेंबर १७९० साली क्षयरोगास बळी पडला. त्यांच्या समवेतदोन बायका सती गेल्या. याच सुमारास देवी अहल्येचे परमनिष्ठ बंधुद्वय महादजी आणि शहाजी अनुक्रमे १७८४ व १७८६ मध्ये निवर्तले. त्याच्यातच दु:खाचा कळस म्हणून त्यांचा जावई यशवंतराव फणसे ३ नोव्हेंबर १७९१ रोजी कॉलन्यास बळी पडले. त्यामुळे मुक्ताबाईने सती जाण्याचा निर्णय घेतला. जरी मातेने-देवी अहल्यांनी - 'मुक्ताईच पाय धरूनि, पारी!' सती नको जाऊस म्हटले. पण धर्मनिष्ठ व पतिनिष्ठ मुक्ताई आपल्या निर्णयापासून ढळली नाही. ती निर्वाणीपणाचा इशारा देत आईला म्हणाली, 'आई ! तुझ्या पायाचं तीर्थ घ्याव अशी तू पावन गंगामाता ! माझं लेकरू आणि पति गेले. तू म्हातारी ! सोबतीण थोड्या दिवसांची ! पुढे माझे कसे होईल ? मी कशासाठी व कशी जगू ?' या बिनतोड प्रश्नांना आईसाहेबांजवळ उत्तर नव्हते. त्यांनी मुक्ताईला सती जाण्याची अनुमती अत्यंत जड अंत:करणाने दिली. या दु:खाची तीव्रता इतकी प्रचंड होती की देवी अहल्यांनी स्वत:स तीन दिवस अन्नपाणी वर्ज्य करून एकंतवासात कोंडून घेतले होते. तदनंतर लगेच त्या दु:ख विसरून कामास लागल्या. मुक्ताई व जावई यशवंतराव फणसेंच्या स्मरणार्थ अत्यंत सुंदर बांधकामाचा नमुना असलेली 'छत्री' त्यांनी बांधली. हे सर्व वर्णन सर जॉन माल्कने केलेले आहे. अशा प्रकारे आतड्याच्या प्रेमाच्या नात्याचा शेवटचा धागा तुटला. त्यात लोरीच्या लढाईत शिंद्याकडून झालेला पराभव त्यांचे मन पोखरत होतेच. तरीही या अभूतपूर्व अविरतपणे कोसळणाऱ्या संकटातुन व दु:खाच्या अग्निपरीक्षेतुन देवी अहल्यांचे जीवनसुवर्ण तावुन सुलाखून निघाले.



दु:खाच्या झंझावातांमध्ये देवी अहल्या दीपस्तंभाप्रमाणे अचलपणे, खंबीरपणे उभ्या होत्या. अगदी आयुष्याच्या शेवटपर्यंत

## दैवीगुणसंपन्न नि:पक्षपाती न्यायदान

होळकरांची राजधानी महेश्वर. तेथील अहल्यांचा शुभ्रवस्त्राच्छादित दरबार म्हणजे खऱ्या नि:पक्षपाती न्यायदानाचा मूर्तिमंत पुतळाच ! जणू आजदेखील त्याचे पावित्र्य व तेज देवी अहल्येच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाने भारल्यामुळे टिकून आहे. त्यांची न्यायदानाची पद्धती राजा विक्रमादित्याची आठवण करून देते. सर्व राज्यकारभार व न्यायदान देवी अहल्या ईश्वराची भीती उरी बाळगून करीत. आपण जे जे करतो त्याचा जाब इश्वर दरबारी द्यावा लागणार आहे ही खूणगांठ बांधुन त्या न्यायदान करीत. त्यांचा दरबार फार उंच नव्हता. त्या मध्यभागी पांढऱ्या शुभ्र घोंगडीवर आसनस्थ होऊन राजकारणातील निर्णय व न्यायदान करीत. स्वत:स कितीही क्लेश व यातना झाल्यातरी चालतील. पण न्यायदान नि:पक्षपाती झालेच पाहिजे यावर देवींचा कटाक्ष असे. याचे उत्तम उदाहरण सिरोंज परगण्यातील खेमदास सावकार निपुत्रिक वारला. त्याच्या विधवा पत्नीने दत्तकविधानाची परवानगी मागितली. परंतु होळकर सरकारच्या कमाविसदाराने त्यासाठी तीन लाख रूपयांचा नजराणा मागितला. याविरुद्ध त्या विधवा सावकारीणबाईने देवी अहल्या यांचेकडे न्याय मागितला. देवींनी सर्व बाबींची जातीने चौकशी केली. त्यांनी दत्तकविधानास संमती तर दिलीच. आणि तिच्या दत्तक पुत्रास स्वत:च्या मांडीवर बसवून घेऊन त्यांच्या तोंडात साखर भरविली. नजराणा घेतला नाही. नजराणा मागणाऱ्या त्या कमाविसदारास सेवेतुन मुक्त केले. यासंदर्भातील दुसरे उदाहरणही बोलके आहे. खरगोण येथील तापीदास संपत्ती मागे ठेवुन निपुत्रिक वारले. तापीदासाच्या विधवा





पत्नीने सर्व संपत्ती देवी अहल्यांच्या पायावर अर्पण करण्याचा मनोदय व्यक्त केला. परंतु निःस्पृह वृत्तीच्या देवीने यांस संपूर्णपणे विरोध दर्शविला. याउलट देवी त्या स्त्रीस म्हणाल्या :

'तुला संपत्तीचा विटाळ होत असेल तर सत्पात्री दानधर्म कर ! लोकोपयोगी कामे करा' हा महान उपदेश त्या विधवा स्त्रीस पटला. तिने नर्मदेवर व अन्यत्र भव्य घाट बांधले. गणेशाचे भव्य मंदिर उभारून तिने हा सदुपदेश आचरणात आणला. यावर भाष्य करतांना कवी रंगनाथ जोशी म्हणतात :

**'प्रजाजनांना सुख संरक्षण**
**देवुनि भूषवी निज न्यायासन**
**सुखी प्रजेला हे तर भूषण**
**म्हणणे करू जे त्याचा जाबही**
**ईश्वर मजकडून घेई.'**

**दिव्य-भव्य जीवनाची सांगता :**

**'तुझ्या स्वरूपे शोभे संस्कृति**
**मानवताही घेई आकृती**

ती उक्ती यथार्थपणे देवी अहल्येच्या उदाहरणाने साकार झाली. हे मनोमन पटते :

**'तरि सकळ जळसमृद्धी ।**
**घेऊनि गंगा रिगाली उदधी ।**
**की श्रुति हे महापदी ।**
**पैठी जाहाली'**

**ज्ञानेश्वरी १३-३७१**

स्वतःच्या निर्मल आचरणामुळे देवी अहिल्या 'युगाहिहूनि वडिल' ठरल्या. त्यांचे लोकविलक्षण कर्तृत्वतेज आजही आपणांस दिपवून टाकीत आहे. त्याचे आदर्शमय जीवन म्हणजे कोणाही मानवास 'चराचरपरमगुरु, चतुरचित्तचमत्कारु' होय. योगेश्वर श्रीकृष्ण परमात्म्यास त्याचा परमसखा अर्जुनासी कितीही संवाद केला तरी तृप्ती होत नाही :

**आतां असो हे विकडी ।**
**मज उघड तुझी आवडी ।**
**म्हणोनि तृप्तीची सवडी ।**
**बोलता न पडे ।।''**

ज्ञानेश्वरी १०-६०

तसे देवी अहल्यांच्या अलौकीक चरित्रांशी कितीही आत्मिक सुखसंवाद साधला तरी तृप्ती कशी ती होतच नाही. हा देवदुर्लभ योग फारच थोड्यांना लाभला आहे. मात्र देवी अहल्यांना मात्र तो उदंड प्रमाणात लाभला आहे. यातच त्यांच्या महनीय, पूजनीय आणि वंदनीय चरित्राचे व चारित्र्याचे गूढ दडलेले आहे. आपण सर्वजण भौतिकवादाचे बळी. 'अज्ञानांध बापुडे' असतो. त्यामुळे 'धृतराष्ट्रा' प्रमाणे 'ईश्वरुचि न देखे !' पण देवी अहल्यासारख्यांच्या सगुण चरित्र परिशीलनाने ईश्वराला पाहू शकते. त्या दृष्टिकोनातून देवींचे चरित्र श्रवण-मनन म्हणजे उत्कृष्ट परमात्मसोपान होय.

**स्मरणी मूर्त हो सुदंर सत्कृती**
**धर्मदीप तू कर्मदीप तू, थोरवी कैसी वर्णावी**

आता देवी अहल्यांच्या निर्वाण काळ समीप आला होता. १२ फेब्रुवारी १७९४ ला शूर रणधुरंधर सेनानी व मुत्सद्दी महादजी शिंदे पुणे मुक्कामी स्वर्गवासी झाले. आजपर्यंत स्वकुटुंबात झालेल्या मृत्युमुळे देवी परम दुःखी कष्टी झाल्या होत्या. समर्थ रामदासांनी शून्य मनाचे वर्णन :

**'समाधान साधूजनाचेनि योगे,**
**परि मागुते दुःख होते वियोगे ।।**
**घडीने घडी शीण अत्यंत वाढे,**
**उदासीन हा काळ कोठे न कंठे ।।'**

असे केले आहे. तीच 'उदासीन' अवस्था देवी अहल्यांच्या मनाची झाली होती. सततच्या संकटाच्या आघातांनी पन्नास वर्षांच्या कार्यप्रवण जीवनामुळे त्यांची काया पूर्णपणे थकून गेली होती. निजधामास जाण्याचे वेध त्यांना लागले होते. याच सुमारास त्यांच्या मनास आनन्द देणारी एक घटना घडली. १७९५ साली मराठ्यांनी एकजुटीने निजामाला खर्ड्याच्या लढाईत पराभूत केले. सतत चंदनाप्रमाणे झिजुन प्रजेला सदैव आल्हाददायक कर्मसुगंध देवींनी दिला. त्या कार्याचा त्यांना गर्व झाल्याचा उल्लेख शोधुनही सापडत नाही. अशी ही प्रशांत वीज श्रावण वद्य १४, शके १७१७, दिनांक १३ ऑगस्ट १७९५ मध्ये आदि तेजात विलीन झाली. मृत्युपूर्वी देवींनी पंधरा एक हजार विप्रभोजनाचा संकल्प सोडला होता. आसन्न काळी मोक्षधेनुचे दान दिले. राजवाड्यात दर्शनी गाय होती. मातुश्री देवी अहल्या निधनाची तिला जाणीव होताच गाईने हंबरडा फोडून प्राण सोडला. अशा तऱ्हेने देवी अहल्या महापदी पविष्ट झाल्या. या संदर्भात ब्रह्मानंदलहरी प्रगट करणारे, चैतन्याचा जिव्हाळा बाळगणारे, साधकांचे मायबापा मुळे त्यांच्या चरित्रास भारतीयांसमोर आणण्याचे भाग्य मिळते आहे. हाही सुवर्णमय योगायोग आहे. देवींनी ज्ञानोबारायांनी वर्णिल्याप्रमाणे

**'कामू ऐशिया वोजा प्रवर्ते ।**
**म्हणोनि धर्मासि होय पुरते ।**
**मोक्षतीर्थांचे मुक्ते ।**
**संसारी भोगी ।।**

**ज्ञानेश्वरी ७-४९**

देवींनी स्वतःच्या आचरणाद्वारे धर्मास पूर्णता आणली. मोक्षतीर्थातील जणू काय मोतीच भोगुन दाखविली आणि या दिव्य आचरणाद्वारे त्यांनी -

**'जो श्रुतिगौरवाच्या मांडवी ।**
**काम सृष्टीचा वेलु वाढवी ।**
**जव कर्मफळेसी पालवी ।**
**आपवर्गी टेके ।।**

**ज्ञानेश्वरी ७-५०**

वेदांनी गौरविलेल्या कर्माचे आचरण मोक्षप्राप्ती होईपर्यंत अहर्निश केले. याचि देही डोळा ते प्रत्यक्षात आणुन दाखविले देवी अहिल्यांनी ! यासंदर्भात वक्रोक्तीपूर्ण इतिहास लिहिण्यात निष्णात अशा सर जॉन





माल्कमलादेखील सत्य तच लिहावे लागले देवी अहल्यांच्या संदर्भात : त्यांच्या जीवनातील - आवडता 'छंद' म्हणजे त्यांच्या सभोवतालच्या सर्व प्राणीमात्रांचा सर्वतोपरी विकास व भरभराट कशी होईल याचा सक्रिय ध्यास त्यांना लागलेला असे.' असे माल्कम लिहितो. अस्तु.

किती लिहावे अन् कसे लिहावे असा संभ्रम पडतो देवींच्या संदर्भात लेखनमर्यादा पाळणे अगत्याचे आहे.

## काही सहजशक्य अपेक्षा

या निमित्ताने केंद्र सरकार टपाल खात्याने देवी अहल्याचें पोस्टाचे तिकिट काढावे .

त्यांच्या नावे राष्ट्रीय स्तरावर स्त्रियांच्या सर्व गुणविकासार्थ केंद्रिय विद्यापीठ स्थापावे.

महेश्वरला राष्ट्रीय स्मारक म्हणुन घोषित करून त्याचे जतन करावे. पर्यटक क्षेत्र म्हणुन महेश्वरचा विकास करावा.

ब्रिटिशांच्या कुटिल कारस्थाने होळकरांच्या इतिहासाची साधने जप्त केलेली होती ती राष्ट्रीय ठेवा म्हणून घोषित करून सर्वांना खुली करावीत. त्या द्वारे भारतीयांना सार्थ अभिमान वाटेल असे अस्मितापूर्ण इतिहासलेखन नव्याने करणे शक्य होईल.

**टीप** : अनेक जण अपभ्रंशाच्या शब्द प्रचलनामुळे 'अहल्या' ऐवजी अहिल्या लिहितात. पण अहल्या हेच योग्य-बरोबर नाव आहे - संपादक.

लोकसभा व राज्यसभेत पुण्यश्लोक अहिल्यादेवीचे तैलचित्र या सोहळ्याच्या निमित्ताने लावण्यात यावे.

सर्व न्यायालयामधून राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचा तसबिरीशेजारी देवी अहिल्यांची तसबीर शासनाने लावावी.

जवाहरलाल नेहरू विद्यपीठ, दिल्ली येथे देवींच्या नावे खास अध्यासन निर्माण करावे.

श्रीक्षेत्र काशी ते रामेश्वर गंगाल कावडीचा मार्ग व त्याचे संशोधन व्हावे.

चांदवड येथील त्यांच्या दरबारी असलेल्या ऐतिहासिक कागदपत्रोचं जतन, संशोधन व प्रकाशन राज्य व केंद्र शासनातर्फे व्हावे.

श्रीक्षेत्र पंढरपूरी होळकर वाडा अद्यापि (दोनशे वर्षे झाली तरी !) उभा आहे. तो आणखी शंभर वर्षे तरी टिकेल अशा दुरुस्तीसाठी दोन्ही शासनाने उदारहस्ते निधी उपलब्ध करून द्यावा.

भारताचेदृष्टे पहिले उपपंतप्रधान, पोलादी पुरुष वल्लभभाई पटेलांनी होळकर मिळकतीचा (सार्वजनिक) न्यास निर्माण करून जे उपकार केले आहेत त्यास उपमा नाही.

या सुवर्णस्मृती सोहळ्याच्या निमित्ताने सुप्रसिद्ध ऐतिहासिक कादंबरीकार



श्री. ना.स. इनामदारांनी जो प्रस्ताव यापूर्वी मांडला आहे तो पुन: उद्धृत करीत आहे. (भारताच्या व ) महाराष्ट्राच्य इतिहासाच्या भिंती आहेत चार. एल्फिस्टन, माल्कम, टॉड आणि वेलस्ली. या चौघांनी मराठेशाहीचा इतिहास असा कोंडून घातला आहे. महाराष्ट्राबद्दल एल्फिस्टन, माळव्याबद्दल माल्कम, राजपुतान्याबद्दल टॉड आणि शेवटच्या लढायाबद्दल वो.स्ली अशी ही चौकडी आहे. ते म्हणतल तेच आमच्या ऐतिहासिक पुरुषांचे रूप. त्यांनी एखाद्या दुष्ट ठरविलं की बाकीच्यांनी त्याचीच री ओढुन ते रूप काळाकुट्ट करण्याची चढाओढ लावायची खरा इतिहास यात हरवला आहे आणि तो बाहेर सापडत नाही ही खरी आजच्या मराठी इतिहासाची शोकांतिका आहे.' तस्मात या सोहळ्याच्या निमित्ताने ज्या अभ्यासून लेखकांनी अशा संशोधनात आपले जीवन वेचले आहे त्यांना व उदयोन्मुख लेखकांचे मंडळ स्थापुन नवा इतिहास लिहवून घ्यावा.

'देवी अहिल्येंच्या पावन चारित्र्याने आम्हांस कायमचे पवित्र व पावन केले. त्याच्या स्वर्गीय व्यक्तिमत्त्वास अभिवादनकरून इथेच विराम घेतो.

卐 卐 卐

## सुविचार

**हवेची खोली म्हणून एखादी स्वतंत्र खोली नाही.**
**सर्वच खोल्यांतून हवा पाहिजे.**
**तसे धर्म म्हणून स्वतंत्र विषय नाही.**
**सर्व व्यवहारात धर्म पाहिजे.**

**- विनोबा भावे**





# साईबाबांची पुण्यतिथी

# मानवधर्माचे पुण्यस्मरण

– अशोक खांबेकर

(विश्वस्त श्री साईबाबा संस्थान शिरडी)

श्रीसाईबाबा नामस्मरणात सर्व 'शक्ती, महती आहे. नस्मरणामुळे अशक्यप्राय गोष्ट शक्य करून दाखविण्याची ताकद आहे. ''श्री साईबाबा' या पांच अक्षरांत पंचमहाभूतांनाही प्रसन्न करण्याची अद्भूत लीला आहे. श्रीसाईबाबांनी सुमारे १५० वर्षापूर्वी शिर्डीसारख्या छोट्या खेड्यात अवतार घेतला व आपल्या लीलांनी साऱ्या विश्वाला अचंबित केले. त्यांच्या सर्वधर्म समभाव शिकवणुकीची सध्याच्या परिस्थितीत भारतवासीयांना फार मोठी गरज आहे. सर्व भक्तजन, जात, धर्म, पंथ, श्रेष्ठ, ज्येष्ठ, कनिष्ठ सर्व काही विसरून श्रीसाईबाबांच्या शिर्डीत बाबांशी एकरूप होतो. येथे 'ना कुणी उच्च ना कुणी नीच, सर्व एकाच मानवधर्माची लेकरं. मानवतेची ज्योत पेटविणारे श्रीसाईबाबा आज लाखो भक्तांचे श्रद्धास्थान, प्रेरणास्थान बनले आहे' श्रीसाईबाबांच्या महानिर्वाणाला ३ ऑक्टोबर १९९५ रोजी ७७ वर्षे पूर्ण होत आहेत.

श्री बाबांचा मंत्र आज ७७ वर्षे महानिर्वाणानंतर भक्तांच्या हृदयावर विराजमान आहे. ''श्रीसाई'' ही तीन अक्षरे म्हणजे ''ब्रह्मा, विष्णू, महेश'' ची प्रतीके आहेत. अशा बाबांच्या जीवन कार्याचा महिमा मी पामराने काय वर्णवावा ? श्रीसाईबाबांच्या ७७ व्या पुण्यतिथिच्या निमित्ताने श्री साईबाबांचे स्मरण हे महत्त्वाचे आहे. त्याच बरोबर सर्वधर्मसमभाव हा राष्ट्रीय एकात्मतेचा महामंत्र प्रत्येक भारतीयाने आपल्या अंगी बाणावा ही श्रीसाईबाबाच्या पुण्यतिथीनिमित्त खरी आदरांजली होय.

श्रीसाईबाबा संस्थानच्या वतीने दरवर्षी रामनवमी गुरुपौर्णिमा हे उत्सव उत्साहाने साजरे केले जातात. लाखो भक्त उत्सवाला उपस्थित असतात.

विजयादशमी हा तर आम्हा हिंदू समाजवासियांना मोठा मोलाचा पवित्र शुभदिवस ! श्री साईबाबांच्या भक्तांना तर या दिवसाचे महत्त्व आगळेच वाटत असते. विजयादशमी म्हणजे बाबांच्या महानिर्वाणाचा दिवस. मर्त्य देहाचा त्याग करून श्रीबाबा सच्चिदानंद स्वरुपी विलीन झाले, तो पवित्र दिवस म्हणजे ''विजयादशमी.'' आज तब्बल ७७ वर्षे त्या घटनेला झाली, बाबा आज देहाने नसले तरी आपल्या दिव्यत्त्वाने, अस्तित्त्वांत आहेत. समस्त भक्तांना त्यांचे अस्तित्त्व पदोपदी जाणवत आहे. आपल्या भक्तांना सोडून बाबा जातीलच कसे ?

**''नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य ।**
**नित्य घ्या प्रचिती अनुभव ।**

त्यांच्या वचनांचा अनुभव गेली ७७ वर्षे साऱ्या भक्तांना येतच आहे. बाबांचे पुण्यस्मरण म्हणजे बाबांच्या उच्च व मानवतावादी शिकवणुकीचे स्मरण. त्या शिकवणुकीचे जर आम्हांला विस्मरण झाले तर बाबांचे भक्त म्हणून घेण्यास आपण कुठवर पात्र ठरतो, याचा विचार ज्यांचा त्याने करावा. बाबांची अनन्यभावे भक्ती म्हणजे रंजलेगांजलेल्यांसाठी झटण्याची आमची प्रवृत्ती. हिचे महत्त्व अनन्यसाधारण आहे हे महत्त्व आम्ही ओळखले पाहिजे. जो दु:खितांचे दु:खनिवारण करण्यासाठी झटतो, जो भुकेलेल्यांना भाकर देतो, जो संकटात सापडलेल्यांना मुक्त करण्यासाठी आपल्या परीने झटतो तो बाबांचा खरा भक्त ।

बाबांची भक्ती म्हणजे भूतमात्रांची सेवा. हिचे आचरण ज्या प्रमाणांत आमच्याकडून होईल त्या प्रमाणांत आम्ही भगवंताच्या कृपेस पात्र होऊ. या पवित्र पुण्यतिथी निमित्त आपण सेवा कार्याचा निर्धार करू या ।





# दासगणूंची साईभक्ती



– द. म. सुकथनकर

(अध्यक्ष श्रीसाईबाबा संस्थान शिरडी)

**संतकवि दासगणूंची साईनिष्ठा-साईभक्ती श्री साईबाबांच्या अगाध लीलांचा भाग आहे. दासगणूंचे भक्तीमार्गी लेखन हा सुद्धा साईकृपेचाच प्रताप आहे. श्रीसाईबाबांनीच दासगणूंना मराठवाड्यात गोरटे येथे पाठविले होते.**

**श्री साईबाबा व दासगणूंचा हा गुरुशिष्यसंबंध लक्षत घेऊनच शिरडी संस्थानचे गोरटे येथे कीर्तन प्रबोधिनीचा श्रीगणेशा करण्याचे योजले असून श्री साई-दासगणू संबंधाचे चिरंतन स्मारक म्हणून ही प्रबोधिनी ओळखली जाईल.**

आधुनिक 'महिपती' संतकवि दासगणू यांच्या रसाळ काव्यात व आख्यानांमध्ये त्यांची श्रीसाईबाबांविषयीची काव्ये व आख्याने विशेष बहारदार आहेत त्यातून व्यक्त होणारी साईनिष्ठा, ज्ञानदेवांच्या गुरुनिष्ठे इतकीच भावमधूर आहे. साईबाबांचे गुणवर्णन अनेकांनी केलेले आहे पण हेमाडपंत आणि संतकवि दासगणू यांनी केलेले बाबांचे गुणसंकीर्तन मोठे हृद्य आहे. सद्गुरू वामनशास्त्री यांनी गुरूपदेश देताना दासगणूंना पंढरीची वारी करण्यास सांगितले. दासगणूंनी गुरुची आज्ञा शेवटपर्यंत पाळली एवढेच नव्हे तर आपला देहही पंढरपुरातच ठेवला. त्यांच्या मनात पंढरपुराएवढीच शिरडी व साईबाबांबद्दल श्रध्दा-निष्ठा होती. त्यामुळेच **'शिरडी माझे पंढरपूर'** असे ते म्हणत असत. त्यांचा हा अभंग श्री साईबाबांची आरतीच ठरला आहे.

**शिरडी माझें पंढरपूर ।**
**साईबाबा रमावर ।**
**शुद्धभक्ती चंद्रभागा ।**
**भाव पुंडलीक जागा ॥**
**याहो याहो अवघें जन ।**
**करा साईशी वंदन ।**
**गणु म्हणे बाबा साई ।**
**धाव पाव माझे आई ॥**





दासगणूंना आपल्या सद्‌गुरूंचा अल्पकाळ सहवास होऊन हरिभक्तीचे रोप त्यांच्या अंत:करणभूमीत सद्‌गुरूकृपेने जरी रूजले गेले होते, तरी त्या बीजरूप रोपाला अनेक आर्त जीवांना सुखछाया देईल अशा महान वृक्षाचे स्वरूप जे पुढे प्राप्त झाले, त्याला शिरडीकर श्री साईबाबांची कृपाच विशेष कारणीभूत झाली. श्री सद्‌गुरू वामनशास्त्री इस्लामपूरकरांनी 'श्री साईबाबा हे माझेच स्वरूप आहेत' असे सांगितल्याने थोर सत्पुरुष श्री साईबाबांना श्री दासगणू महाराज गुरूस्थानी मानत असत.

प्रथमत: श्री साईबाबांचा आणि श्री दासगणूंचा जो परिचय झाला तो श्री. नानासाहेब चांदोरकरांच्यामुळे. श्री. चांदोरकर श्री साईबाबांना ईश्वरासमान मानीत. त्यांनीच इ.स. १८९६ साली श्री दासगणूंना शिरडीस नेले. श्री साईबाबांशी त्यांचा परिचय जसजसा वाढत गेला, त्यांच्या त्रिकालज्ञानाचा प्रत्यय येऊ लागला, तसतसे श्री साईबाबा ही अलौकिक विभूती आहे, याची साक्ष पटून श्री साईबाबांच्या चरणी दासगणूंची निष्ठा स्थिरावली.

## *संतचरित्र लेखनाचा श्रीगणेशा*

बाबांनी एक दिवस चांदोरकरांना सुचविले, **''नाना, सगळ्या संतमंडळींना जेवावयास बोलीव ! सगळी सिद्धता चांगली कर आणि आपल्या या गणूवर (दासगणू) सर्व संतांना बोलाविण्याचे काम सोंपीव ! तो आणील बोलावून सगळ्यांना. एवढे कर बरं गणू ! तुझे लई कल्याण होईल !''** याचा अभिप्रेत गूढार्थ असा होता की, संतचरित्रकार महिपतीनें आपल्या भक्तलीलामृतादी ओवीबद्ध ग्रंथांतून संतांची चरित्रे काव्यमय भाषेत गायिली आहेत, तशी यांनी वर्णावी. ही आज्ञा श्री दासगणूंनी अवमानिली नाही. संतचरित्रे लिहिण्यास त्यांनी आरंभ केला. दासगणूंची काव्यमंदाकिनी शृंगाराच्या दऱ्याखोऱ्यांतून खळखळत वाहण्याचे सोडून भक्तीच्या प्रशांत प्रदेशांतून वाहू लागली.

साईबाबांच्या आज्ञेप्रमाणे 'भक्तिलीलामृत' लिहावयास घेऊन संतचरित्रे नैसर्गिक रसाळ वाणीने गात असताना, श्री दासगणूंच्या काव्याचे मूळचे सोज्वळ स्वरूप प्रगट होऊ लागले. बाबांचेही दासगणूंवर फार प्रेम होते. पुष्कळ लोकांवर श्री बाबा कधी कधी रागवत, शिव्या देत, मारहाण करीत, पण श्री दासगणूंवर मात्र रागावल्याचे कोणी कधी त्यांना पाहिले नाही. श्री दासगणू जणू श्री साईबाबांचे 'प्रल्हाद' होते. श्री बाबांच्या आज्ञेवरूनच दासगणूंनी नोकरीचा त्याग केला आणि ते शिरडीला आले. नोकरी सोडली. आता आपले पुढे काय ? ही विवंचना मागे होतीच. त्यांना काळजी लागलेली पाहून श्री बाबा म्हणाले. ''गणू, देव पाठीराखा असताना चिंता कसली करतोस ! नांदेडकडे जा ! तेथे मी तुझी सर्व व्यवस्था केली आहे.''

श्री बाबांची आज्ञा शिरसावंद्य मानून श्री दासगणू महाराज प्रथमच मोगलाईत (मराठवाड्यात) आले. त्यांचा 'संतकवि' असा जो लौकिक झाला तो मराठवाड्यातच.

## *बाबांचा चमत्कार*

दासगणूंच्या जीवनात श्री साईबाबांचे अनेक चमत्कार घडले. त्यापैकी एक प्रसंग हृदयस्पर्शी आहे. श्री दासगणूंचा मुक्काम शिरडीस असताना एकदा काही विशेष पर्वाच्या निमित्ताने गोदास्नानास जावे, असा दासगणूंचा विचार होता. त्यांचे गोदावरीवर अतिशय प्रेम होते. गोदास्नानासाठी पुणतांब्याला जाण्याकरिता दासगणू श्री बाबांची संमती मागत होते. बाबा काही ती देत नव्हते. अनेक तऱ्हांनी विनवण्या केल्या, तर श्री बाबा मानीनात. बाबा म्हणाले, **''इतकी तळमळ रे कशासाठी गणू ? विशेष दिवशी गोदास्नानातच काही अधिक आहे का ? आतून स्वच्छ व्हावे, पवित्र व्हावे ! कातडी भिजवून काय होणार ! पर्व दिवशी गोदा हवी आणि एरवी नको ! गोदा नेहमीच जवळ असावी. आपल्याजवळ आहे, उगीच दु:ख का करतोस!''**

श्री दासगणूंना यावर काही बोलता आले नाही, पण मनाची तळमळ शांत होईना. पर्व दिवशी सकाळीच दासगणू श्री साईबाबांच्या दर्शनास गेले. चरणांवर मस्तक ठेविले आणि चरणांस हात लाविला तो काय श्री बाबांच्या पायांच्या दोन्ही अंगठ्यांतून निर्मल जलधारा स्त्रवू लागली. श्री दासगणूंनी ते पाणी ओंजळीत घेतले, अत्यंत श्रद्धेने स्वत:च्या डोक्यावर शिंपडले आणि गोदास्नानापेक्षाही निरूपम आनंद उपभोगिला. बाबा म्हणाले, **''झाले का समाधान गणू ?''**

या चमत्कारामुळे श्री दासगणूंच्या मनामध्ये श्री साईबाबांविषयीची श्रद्धाभक्ती अधिक दृढ झाली. तो प्रसंग दासगणू असा वर्णन करतात -

**अगाध शक्ति अघटित**
**लीला तव सद्‌गुरूराया ।**
**जड जीवातें भवीं तराया**
**तूं नौका सदया ।**
**वेणीमाधव आपण होऊन**
**प्रयाग पद केले ।**
**द्वय अंगुष्ठीं गंगायमुना**
**प्रवाह दाखविले ।**
**कमलोद्भव कमलावर**
**शिवहर त्रिगुणात्मक मूर्ति ।**
**तूंच होऊनी साईसमर्था**





**विचरसी भूवरतीं ।**
**ऐसें असतां उगीच मन्मन**
**भटकत हें फिरतें ।**
**आतां विनंती हीच तुला गा**
**स्थिर करणें त्यातें ।**
**अधमाधम मी महापातकी**
**शरण तुझ्या पायां ।**
**आलों निवटा दासगणूचे**
**त्रिताप गुरुराया ॥**

श्री दासगणूंची मनोभूमी बाबांच्या सहवासात तयार झाली होती.

## *मैं अंधा हूँ, बंदा तुम्हारा ।*

शिरडीस रहात असताना श्री दासगणूंना एकदा रामनवमीच्या उत्सवासाठी म्हणून कीर्तनास जाण्याचा प्रसंग आला. कीर्तनकारांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे थाटाचा पोशाख करून श्री दासगणू कीर्तनास निघाले. जाताना नमस्कार करण्यासाठी श्री बाबांच्याकडे गेले असता बाबांनी विचारले, ''**कुठे निघालास रे गणू ?**''

''कीर्तन करण्यास जातो बाबा.''

''**असा नवऱ्यामुलासारखा नटून ! अरे परमार्थासाठी कीर्तन ना ! मग हा थाटमाट कशासाठी ! काढ ते सगळे !**'' श्री बाबांनी दासगणूंना उपरणे तेवढे अंगावर घ्यावयास दिले आणि म्हणाले, ''जा ! आजपासून असेच करीत जा कीर्तन !'' तेव्हापासून श्री दासगणू महाराज नारदीय पोशाख करून कीर्तन करू लागले. ही परंपरा आजही कायम आहे. कीर्तनास प्रारंभ करताना पहिले समर्थ रामदास नमनपद म्हटले जाते. त्यांनतर साईबाबां बद्दलचे खालील हिंदी पद म्हटले जाते.

**रहम नजर करो अब मोरे साई ।**
**तुम बिन नहीं मुझे माँ-बाप-भाई ॥धृ.॥**

**मैं अंधा हूँ बंदा तुम्हारा ।**
**मै ना जानूं अल्लाइलाही ॥१॥**

**खाली जमाना मैंने गमाया ।**
**साथी आखिर का किया नहीं कोई ॥२॥**

**अपने मसजिद का झाडू गनू है ।**
**मालिक हमारे तुम बाबा साईं ॥३॥**

- कीर्तनाचा पूर्वरंग संपल्यानंतर श्री बाबांवरील दुसरे पद म्हटले जाते -

**साईं रहम नजर करना ।**
**बच्चों का पालन करना ॥धृ.॥**

**जाना तुमने जगत्पसारा ।**
**सबही झूठ जमाना ॥१॥**

**मैं अंधा हूँ बंदा आप का ।**
**मुझको प्रभु दिखलाना ॥२॥**

**दासगणू कहे अब क्या बोलूं ।**
**थक गयी मेरी रसना ॥३॥**

या पदानंतर उत्तररंगात एखादे संतचरित्र सांगितले जाते. श्री साईबाबांवर संतकवि दासगणूंनी भूपाळ्या, पदे, श्लोक, अष्टके, आरत्या इत्यादी कितीतरी लेखन केलेले आहे. त्यांनी लिहिलेले **'श्रीसाईनाथस्तवनमंजिरी'** तील स्तवन साईभक्तांच्या अंत:करणाला सद्गदीत करणारे आहे.

**जातगोतातीता सिद्धा ।**
**अचिंत्या करुणालया ।**
**पाहि माम् पाहि माम् नाथा ।**
**शिर्डीग्रामनिवासिया ॥१॥**

**श्रीज्ञानार्का ज्ञानदात्या ।**
**सर्वमंगलकारका ।**
**भक्तचित्त मराळा हे ।**
**शरणागत रक्षका ॥२॥**

**सृष्टिकर्ता विरिंची तूं ।**
**पाता तू इंदिरापती ।**
**जगत्रया लया नेता ।**
**रुद्र तो तूंच निश्चिती ॥३॥**

**तुजविणें रिता कोठे ।**
**ठान ना या महीवरी ।**
**सर्वज्ञ तूं साईनाथा ।**
**सर्वांच्या हृदयांतरी ॥४॥**

**ठेव आता शिरी माझ्या ।**
**कृपेचा करपंजर ।**
**शोक चिंता निवारावी ।**
**गणू हा तव किंकर ॥५॥**

आपल्या सद्गुरुविषयीची निष्ठा किती प्रबळ, उत्कट असावी लागते याची साक्ष श्री दासगणू महाराजांच्या भक्तितून प्रत्ययास येते.

**(शब्दांकन : विद्याधर ताठे)**

卐 卐 卐



# संतसाहित्यातील नामस्मरण भक्ती

- डॉ. हे. वि. इनामदार
(अध्यक्ष गीताधर्म मंडळ पुणे)

'नामा परते तत्व नाही रे अन्यथा' असे म्हणत ज्ञानदेव - नामदेव - एकनाथ - तुकाराम आणि रामदास यांनी गायलेल्या नाममहात्म्याने अवघा महाराष्ट्र दुमदुमत आहे. सत्ययुग - व्दापारयुग - त्रेतायुग या काळापेक्षा विद्यमान कलियुगात नामस्मरण हेच मुख्य साधन आहे. म्हणूनच संतांनी म्हटले आहे की - कलियुगी उध्दार हरिच्या नामे ।



अशा हरिनामाचे म्हणजेच नामस्मरण भक्तीचे श्री साईबाबांनीही अनेकांना महत्त्व सांगितलेले आहे. श्री साईबाबांच्या पुण्यतिथीच्या मंगल पर्वात, नामस्मरण भक्तीचे विविध संतांनी प्रतिपादन केलेले महत्त्व वाचून वाचकांना त्यांच्याठायी असलेल्या एकत्त्वाचेच विलोभनिय दर्शन घडेल.



मूळ भक्तितत्त्व एकत्र असले, तरी भक्ताच्या वृत्तीप्रमाणे ते अनेक प्रकारांनी व्यक्त होत असते. भक्तीच्या अविष्कारातील हे विविधत्व संत साहित्यात व्यक्त झाले आहे. भागवत पुराणातील नवविधा भक्तीला अनुलक्षून संतांनी आपले विचार मांडले आहेत. नवविधा भक्ती विषयीचा श्लोक असा आहे :

**'श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम्।**
**अर्चनं वंदनं दास्यं सख्यं आम निवेदनम्॥**

भागवत पुराण, (७-५-९३)

श्रवण, कीर्तन, स्मरण, चरणसेवा, अर्चन, वंदन, दास्य सख्य व आत्मनिवेदन असे भक्तीचे एकूण नऊ प्रकार आहेत. त्यांपैकी 'स्मरण' या प्रकारांवर संतकवींचा विशेष भर आहे.

संतांनी जी स्मरण-भक्ती सांगितली आहे, ती मुख्यत: नामभक्ती आहे श्री विठ्ठलाच्या नामाचे स्मरण संतांना अभिप्रेत आहे; विठ्ठलमूर्तीचे स्मरण नव्हे. ती मूर्ती तर ते रोजच पहात होते. साधकाला कॉ. सु. परोपरींनी सांगितले आहे. नामचिंतनाने कॉ. सु. येते; त्यामुळे त्याला मोक्षसुखाची प्राप्ती होऊ शकते. वैकुंठातील सर्व सुख नामधारकाच्या पायाशी लोळण घेते.

## ज्ञानदेवांची नामभक्ती

ज्ञानेश्वरीत नामघोषाचा गौरव करण्यात आला आहे. गीतेच्या नवव्या अध्यायातील 'सततं कीर्तयन्तो माम् --।' या श्लोकाचा भावार्थ स्पष्ट करताना ज्ञानदेव म्हणतात :-

**''ऐसे माझे नि नाम घोषें।**
**नाहींची करिती विश्वाचीं दुःखे।**
**अवघें जगचि सहासुखे।**
**दुमदुमित भरलें॥**
**कहीं एकाधिति वैकुंठा जावें।**
**तें तिही वैकुंठचि केलें आघवें।**
**ऐसें नामघोष-गौरवें।**
**धवळलें विश्व॥**
**कृष्ण, विष्णु, हरि, गोविंद।**
**या नामांचे निखळ प्रबंध माजी**
**आत्मचर्चा विशद।**
**उदंड गाती॥''**

भक्तजन परमेश्वराच्या नामघोषाने विश्वाची दु:खे नष्ट करतात. सर्व जगच ब्रह्मसुखाने ते कोंडून टाकतात. पूर्वी असे होते की, कधी तरी एखादाच साधक वैकुंठाला जाऊ शकत असे. पण भगवंताच्या या भक्तांनी सर्व आसमंताला वैकुंठाची पदवी मिळवून दिली. याप्रमाणे भगवंताच्या नामघोषाच्या महिम्याने त्यांनी संपूर्ण विश्व प्रकाशित केले. ते महात्मे सतत कृष्ण, विष्णू, हरी व गोविंद या नामांचेच कथन करतात. अधूनमधून परमार्थ विचाराचा ते सविस्तरपणे ऊहापोहही करतात.

ज्ञानदेवांच्या अभंगवाणीतही नाममहिमापर रचना विपुल प्रमाणात आढळतात. 'समाधिसाधन संजीवननामा', 'सार सार सार विठोबा नाम तुझें सार।,' 'सकलमंगल निधी, विठ्ठलाचे नाम आधी।', 'नाम पवित्र आणि परिकरू, कल्पतरूहूनि उद्धारू।', 'प्रेमाचा जिव्हाळा नाम मुखासि आलें, सार्थक पैं जालें संसाराचे।' असे नामाचे पाठ ज्ञानदेवांनी आळविले आहेत. हरिपाठातील त्यांचा प्रसिद्ध अभंग पाहा :-

**'एकतत्त्व नाम दृढ धरी मना।**
**हरीसि करुणा येईल तुझी॥**
**तें नाम सोपें रे रामकृष्णगोविंद।**
**वाचेसी सद्‌गद जपे आधी॥**
**नामापरतें तत्त्व नाही रे अन्यथा।**
**वाचा आणिका पंथा जाशी झणी॥**
**ज्ञानदेवा मौन जपमाळ अंतरीं।**
**धरोनि श्रीहरी जपे सदा॥''**

- देवाचिया द्वारीं क्षणभरी उभे राहण्याचा संदेश देवून ज्ञानदेवांनी नामसंकीर्तनाच्या माध्यमातून साधकांसाठी विठ्ठल प्राप्तीचे महाद्वारच उघडून दिले आहे !

## नामदेवांचा नामवेद

विठ्ठलाचे नाम हे नामदेवांच्या समग्र अभंगसंहितेचे जणू ध्रूपदच आहे. चोवीस नामांचा महिमा, अशा प्रकरणांतून नामदेवांनी आपली असीम नामभक्ती व्यक्त केली आहे : 'नामविणें वेद आणिकें नाही।' तसेच, **'आकाराला देव नामरूपा आला। म्हणोनि स्थपिला नामवेदीं।'** या शब्दांत त्यांनी नामास वेदत्व अर्पण केले आहे.

आपला हा नामवेद नामदेवांनी पुढील शब्दांत मांडला आहे : ''देव दयानिधी आहे. तो भक्ताचा कैवारी आहे. नाम घेताच तो सर्वांना तारतो. त्याच्याजवळ यातिकुल किंवा उच्चनीच असा भेद नाही. तो फक्त शुद्ध भाव पाहातो. नाम गोड असते. ते जन्माचा निवाडा करते. हरिकथा भवव्यथा हरण करते. ज्याला विठ्ठलनामाची गोडी लागली, त्याने परमार्थाची प्रौढी केली, असे समजावे शेतात थोडे बी पेरून गाडा भरून धान्य आणावे, तसे एका नामाने जन्माचे साकडे फिटते. वेदपठन व शास्त्रबोध यापेक्षाही नामाचे प्रबंध पाठ करणे चांगले. केळे सोलून साखरेत घोळले व ते अंधारात खाल्ले तरी ते गोड लागते. पण त्याहूनही विठ्ठलाचे नाम अधिक मधुर आहे. नामस्मरणाने मनात विवेक जागा होतो व जिभेला अमृताचे पाझर फुटतात.'' नामदेव पुढे म्हणतात :-

**''अमृताहूनि गोड नाम तुझे देवा।**
**मन माझें केशवा कां बा नेघे॥**
**सांग पंढरीराया काय करूं यासी।**
**कां रूप ध्यानासि न ये तुझें॥**
**कीर्तनीं बैसता निद्रें नागविलें।**
**मन माझें गुंतले विषयसुखा॥**
**हरिदास गर्जती हरिनामाच्या कीर्ति।**
**न ये माझ्या चित्तीं, नामा म्हणे॥''**

विठ्ठलाम ही अमृताची खाण आहे. तसेच नामामुळे सगुण व निर्गुण यांतील समन्वय साधला जातो, हे नामदेवांनी स्पष्ट केले आहे.





## दासी जनीचे नामसंकीर्तन

**'मी तों समर्थाची दासी । मिठी घालीन पायांसी ॥'** अशी संत जनाबाईंची धारणा आहे. **'गातां विठोबाची कीर्ती । महापातकें जळती ॥'** असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

'नाम विठोबाचें घ्यावें । मग पाऊल टाकावें॥' किंवा, 'एक नाम अवघें सार । वरकड अवघें तें असार ॥', अथवा, 'नाम फुकट चोखट । नाम घेता न ये वीट ॥' अशा आपल्या विविध अभंगातून जनाबाईंनी नामस्मरणाचा महिमा विशद केला आहे.

## नाथांची नामसाधना

नामघोष हा भागवत धर्माचा बीजमंत्र आहे. संत एकनाथांना नामसाधनेचे अपरंपार महत्त्व वाटते. ते म्हणतात, ''नामाचा आठव तो परब्रह्म, व नाठव तो भवभ्रम होय. नाम हे परब्रह्मरूप आहे. ते सुलभ-सोपे आहे. नामरसापुढे अमृतही फिके होय. ज्याच्या मुखी नाम, त्याच्या हृदयी देव बसतो. 'हरि बोला, हरि बोला; नाहीतरी अबोला !'

**तुमचे नाम आठवितां ।**
**धणी न पुरे पंढरीनाथा ॥**
**सुख अनुपम्य कल्प कोडी ।**
**युगातेसी एक घडी ॥**
**निजध्यास जडतां नामीं ।**
**सुखे सुख दुणावे प्रेमी ॥**
**एका जनार्दनी नाम ।**
**श्रेष्ठ धामांचे हे धाम ॥''**

हरीचे नाम गाताना इंद्रिये निमाली, चित्तशुद्धी झाली; आणि स्वधर्म वाढीस लागला, असा भक्ताला रोकड प्रत्यय येतो.

## तुकोबांनी केलेला नामाचा गजर

फुटो हें मस्तक, तुटो हें शरीर । **नामाचा गजर सोडूं नये ॥'** असा आपला निर्धार संत तुकाराम महाराजांनी व्यक्त केला आहे. साधकाने निर्वाहापुरते अन्न-आच्छादन ठेवावे. चित्त चळू न देता हृदयी नारायण साठवावा; विष्णुमय जग हाच वैष्णवांचा धर्म आहे, यावर मनोमन विश्वास बाळगावा. जन्मास आल्यासारखे हरिदास होऊन देवाचा कृपाप्रसाद मिळवावा व आनंदे आनंद वाढवावा, असा साधकबोध तुकोबांनी केला आहे. त्यांची नामभक्ती स्पष्ट करणारा पुढील अभंग पाहा :-

**''घेई घेई माझे वाचे ।**
**गोड नाम विठोबाचे ॥**
**डोळे तुम्ही घ्यारे सुख ।**
**पाहा विठोबाचे मुख॥**
**तुम्ही आईका रे कान ।**
**माझ्या विठोबाचे गुण॥**
**मना, तेथे धाव घेई ।**
**राहें विठोबाचे पायीं ॥**
**तुका म्हणे जीवा ।**
**न सोडू या केशवा ॥''**

अखंड नामोच्चाराने हरिदासाचा देह पवित्र व वाणी पुण्यवती होते. त्याच्या अंगणी कल्पलता फुलतात. त्याच्या दारी ब्रह्मज्ञान काकुळतीने येते; व विठ्ठलभेटीचे 'सोलीव सुख' त्याला लाभते, असे तुकोबा सांगतात.

## समर्थांचे रामनामस्मरण

'मुख नाम हातीं टाळी' आणि 'अंतरीं देवाचे ध्यान' अशी रामदासस्वामींची नामभक्ती आहे; नामस्मरणामुळे आसक्ती तुटून विरक्ती उद्भवते, चित्तशुद्धी घडून दृढ बुद्धी होते, प्रबोध वाढून प्रज्ञा चढते, मनास श्रीरामाची भूक लागते, कारण नामस्मरण व नामश्रवण यांची प्रचीती 'हातीच्या हाती ' म्हणजे रोकडी असते. समर्थ म्हणतात,

**सांडून आपली संसार व्यथा ।**
**जावी देवाची चिंता ॥**
**निरूपण कीर्तन कथावार्ता ।**
**देवाच्याचि सांगाव्या ॥**
**देवाच्या सख्यत्वासाठी ।**
**पडाव्या जिवलगांसी तुटी ।**
**सर्व अर्पावि, शेवटी -।**
**प्राण तोहि, वेचावा॥''**

सद्गुरुपासून मिळालेल्या सबीज नाममंत्राचे अखंड स्मरण करणे हेच भक्ताचे साधन होय. त्याच्या योगाने आत्मारामाची जोड होते, असे समर्थ म्हणतात. राघवाची पदे मानसी धरून विश्व हेळामात्रे उद्धरण्याची त्यांची आकांक्षा होती. 'रामचरणी आमुचा विश्वास ।' असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

मध्ययुगीन संतकवींच्या नामस्मरण भक्तीचा मागोवा येथवर आपण घेतला. या पूर्वसूरींप्रमाणेच अर्वाचीन काळातील संतसज्जनांनीही नाममहिमा आपापल्या काव्यसंपदेतून सांगितला आहे; त्यांच्या नामविचारांचे विहंगदर्शन पुढीलप्रमाणे घेता येईल.

## श्री माणिक प्रभू

(इ.स. १८१७-१८६५)

**'मना, गोविंद गोविंद वद हें वाचें ।**
**काही साधन कर सागर पार**
**व्हायचें ॥**
**माणिक म्हणे लाग गुरुपायीं ।**
**चुकवी भय यमराजाचें ॥''**

## श्री गोंदवलेकर महाराज

(इ.स.१८४४ ते १९१३)

**''अहो, एका नामापुढें ।**
**ब्रह्मज्ञान तें बापुडें ॥**
**ब्रह्म होणें काय फुका ।**
**ऐसें ज्ञान ऐकूं नका ॥**
**नाम नसता ब्रह्म झाला ।**
**ऐसा कोणी हो ऐकिला ॥**
**दीन-दास सांगे तुम्हा ।**
**मुखीं रामनाम घोका॥''**





### श्री वासुदेवानंद सरस्वती

(इ.स.१८५४-१९१४)

"अति सुलभ दत्त नाम।
न पडे ज्या किमपिदास ।।
निज जिव्हा ही साधन।
नाम घेता नोहे दीन ।।
महात्म्य दत्त नामाचे।
हो अगम्य वेद-वाचें ।।
वासुदेव म्हणे दत्त।
नामें भक्त होती मुक्त ।।"

### श्रीपंत महाराज बाळेकुंद्रीकर

(इ.स.१८५५-१९०५)

"दत्तनाम जपा।
परात्पर दत्तनाम जपा ।।
दत्तनामामृत निशिदिनीं पिऊनी,
पाहा आत्मरूपा ।।
अनंत सचराचर अजोडीं।
बालमुकुंद सोपा ।।
नित्य निरंजन दत्त देखुनी।
निरंजनीं हारपा ।।"

### श्री गुलाबराव महाराज

(इ.स.१८८१-१९१५)

"नाम साजर साजर।
करी फुकट अमर ।।
दुजी क्रिया नको काही।
सुखे गावा शेषशायी।।
पळ रिती नसो वाणी।
डोळा यावें प्रेमपाणी ।।
म्हणे ज्ञानेश्वर-बाळा।
हेंचि आवडे गोपाळा।।"

### स्वामी स्वरूपानंद

(इ. स.१९०३-१९७४)

"रामकृष्ण हरि गोविंद।
मना लागो हाचि छंद ।।
भक्तिभावें रात्रंदिन।
घडो चित्ता हरि-चिंतन ।।
दृष्टिलागी एक मात्र।
हरि दिसो दे सर्वत्र ।।
स्वामी म्हणे सर्वथैव।
हरि पायीं जडो जीव ।।"

### श्री तुकडोजी महाराज

(इ.स.१९०९-१९६८)

"ऐसें वाटे मना, घडो प्रभुचिंतन।
राहो मुखीं नाम, मन ध्यानीं तल्लीन ।।
तुकड्यादास म्हणे जीव होवो समरस।
ऐसा निजध्यास लाभो अंगी तो रस ।।"

परमेश्वराचे नामस्मरण हे संतसज्जनांचे मुख्य साधन असून, सद्गुरूकडून मिळालेल्या सबीज नाममंत्राचे चिंतन हे साधकाचे सारसर्वस्व आहे, हेच गेल्या सात शतकांतील संतसाहित्याचे प्रमुख प्रमेय आहे!

卐 卐 卐

## भक्तीचा सोपा मार्ग

जीवनाचें ध्येय सांगून झालें, पण तें गाठांवयाचें कसें ? भक्ति, ज्ञान, कर्म, ध्यान, योग इत्यादि किती तरी मार्ग साधकाला त्या मुक्कामास नेऊन पोचविणारे आहेत. पण ज्ञानयोग काय किंवा कर्मयोग काय अथवा योगविद्या काय, सर्वसामान्य मानवाला साध्य कशी होईल? म्हणून भक्तीचा सोपा मार्ग ज्ञानदेव सांगातात. ईश्वर व भक्त यांचें अद्वैत त्यांना संमत आहे, पण तरीही भक्त ईश्वराचें भजन-पूजन करूं शकतो, अशी त्यांची भूमिका आहे. बावन्नकशी सोनें व पन्नासकशी सोनें -- असा भेद देव व भक्त यांत ज्ञानदेव करतात. जेव्हां हे भक्त एकमेकांना भेटतात व ईश्वराचें गुणगान करूं लागतात, तेव्हां प्रेमाचे व आनंदाचे जे कल्लोळ उठतात, त्यांचे ज्ञानेश्वरांनी उभें केलेलें चित्र केवळ अप्रतिम आहे.

पार्था माझ्याकडे येण्याला, माझ्यांत मिसळण्याला, माझ्यांशी एकरूप होण्याला, साधनांचे बंधन नाहीं. अमुकच एक साधन केलें म्हणजे माझी प्राप्ती होते असें नाहीं. अनंत मार्ग आहेत माझ्याकडे येण्याचे. कोणी माझी भक्ती करो कीं वैर करो, ज्ञानमार्ग धरो कीं योगमार्ग अनुसरो, -सारे मजकडेच येणार. सर्व मार्गांचा शेवटचा मुक्काम म्हणजे मी.

कोणत्याही निमित्तानें असो, कोणत्याहि मिषानें असो, माझें स्मरण, माझें चिंतन जो जो करतो, तो तो मला पावतो.

- दा. न. शिखरे

('ज्ञानेश्वरीतील अमृतकण' मधून)





# सामाजिक ऐक्याचे प्रवर्तक संत कबीर

– बी व्ही सावंत (भोसले)
साहित्यविशारद :

**संत कबीर व श्री साईबाबां यांच्यामध्ये विलक्षण साम्य आढळते. दोघेही निस्सीम रामभक्त होते. 'राम रहिम एक,' असा दोघांचा उपदेशही एकच होता. सामाजिक ऐक्याचे प्रतिक म्हणून श्री साईबाबांबरोबरच संत कबीरांची शिकवण चिंतनीय आहे.**

श्री साईबाबा व संत कबीर हे दोघेही नाथपंथीय हठयोगी होते, साईबाबा हे एकटेच दाट जंगलात ओब्याच्या काठी जाऊन पोटातील आंतडी बाहेर काढून स्वतः धूत, व नंतर पुन्हा पोटात घालीत, तसेच ते अत्यंत बारीक चिंधीने बांधलेल्या छोट्याश्या झोपाळ्यावर रात्री झोपत असत. अशा प्रकारचे अलौकिक चमत्कार करणे हे नाथपंथीयांचे वैशिष्ट्य होते. अशाच नाथपंथीय असलेल्या व श्री साईबाबांच्या विचार प्रणालीप्रमाणेच राम-रहिम एक है।'' असा प्रचार करणाऱ्या संत कबीर यांचा थोडक्यात परिचय करून देत आहे.

**।। सबका मालिक एक ।।**

संत कबीरांनी आपल्या खडी बोलीतील दोह्यातून, सर्वांचा देव एकच आहे. या तत्त्वाचा तसेच धर्मभेद-जातीभेद नष्ट करण्याचा प्रचार केला. बाह्य देखाव्या व उपचाराबद्दल ते म्हणतात :-

**'मुँड मुँड हरि मिलै । सब कोई लेय मुँडय ।।**
**'बार–बार के मुँडते । भेड व वैकुंठ जाय ।।**

ते पक्के निर्गुण वादी संत होते म्हणून ते उपहासाने म्हणतात -

**''पत्थर पूजे हरी मिले। तो मै पूँजे पहाड।''**

कबीर कट्टर रामभक्त होते, परंतु त्यांचा राम इतर रामभक्ताहून भिन्न निराळा होता तो असा :-

**''दशरथ सुत तिहुँ लोक बरवाना।**
**राम नामका मरम है जाना।''**
**रुप नही, रंग नही,**
**नहीं बरन (वर्णन) छाया।**
**निर्विका निर्गुण तू रघुराया।**

त्यांनी राम नामाचे महात्म्य साईबाबाप्रमाणेच पूर्ण जाणले होते. शिवाय ते ईश्वरभक्तीचे बाह्य-प्रदर्शन, देवपूजेचे बाह्य-आवडंबर, दान-धर्म उपवास वगैरे पुरातन धर्मरूढीच्या कट्टर विरोधी होते. त्यांनी या विरुद्ध आपल्या दोह्यातून या अंधश्रद्धेविरुद्ध आसूड ओढले आहेत, ते ईश्वराकडे मागणे मागतात,